यूपीएससीची तयारी

प्राकृतिक भूगोल

- श्रीकांत जाधव

प्रस्तुत लेखामध्ये प्राकृतिक भूगोल या घटकाची परीक्षेच्या दृष्टीने तयारी कशी करावी, याबाबत माहिती घेणार आहोत. अभ्यासक्रमामध्ये भारत व जगाचा भूगोल असे नमूद केलेले आहे म्हणून प्राकृतिक भूगोलाची तयारी करताना जगाचा प्राकृतिक भूगोल आणि भारताचा प्राकृतिक भूगोल अशी सर्वसाधारण विभागणी करावी लागते. या विषयाचे परीक्षेच्या दृष्टीने अभ्यासाचे नियोजन करताना सर्वप्रथम या विषयातील घटकांची माहिती असणे आवश्यक असते. प्राकृतिक भूगोलामध्ये मुख्यत्वे भूरूपशास्त्र, हवामानशास्त्र, सागरशास्त्र, जैविक भूगोल आणि पर्यावरणीय भूगोल यांसारख्या घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचे मूलभूत अर्थात पारंपरिक ज्ञान सर्वप्रथम अभ्यासावे लागते. वर नमूद केलेल्या घटकांसंबंधी अभ्यासाव्या लागणाऱ्या संकल्पना, त्यांची वैशिष्ट्ये याची माहिती सर्वप्रथम असणे आवश्यक ठरते.

२०१३ ते २०२१ दरम्यान या घटकावर विचारण्यात आलेले काही प्रश्न व त्यांचे स्वरूप :

२०२१ मध्ये भारताला उपखंड का मानले जाते? विस्तृतपणे उत्तर द्या. असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. हा प्रश्न समजून घेताना खंड आणि उपखंड निर्धारित करण्यासाठी कोणती वैशिष्ट्ये ग्राह्य धरली जातात याची माहिती असावी आणि ह्या प्रश्नाचे उत्तर लिहिताना भारताला उपखंड का मानले जाते याची विस्तृतपणे मांडणी करणे गरजेचे आहे.

२०२० मध्ये 'वाळवंटीकरण प्रक्रियेस हवामानाच्या सीमा नसतात. उदारणासह समर्थन करा.' असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. यातील 'वाळवंटीकरण यावरील प्रश्न हा सर्वसाधारणपणे जगाच्या भूगोलाच्या संदर्भात विचारण्यात आलेला आहे, पण ह्या प्रश्नाचे उत्तर लिहिताना यामध्ये भारतातील वाळवंटीकरणाचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच, वाळवंटीकरण प्रक्रियेस हवामानाच्या सीमा नसतात हे सहउदाहरण दाखवून द्यावे लागते.

२०१९ मध्ये जागतिक तपमानवाढीमुळे प्रवाळ जीवन पद्धतीवर (coral life system) होणाऱ्या परिणामांचे उदाहरणासह मूल्यांकन करा. असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. या प्रश्नामध्ये सर्वप्रथम प्रवाळ जीवन पद्धती म्हणजे काय आहे आणि याची असणारी उपयुक्तता हे माहिती असणे गरजेचे आहे. याचबरोबर जागतिक तपमानवाढ काय आहे? आणि याचा नेमका कोणता परिणाम प्रवाळ जीवन पद्धतीवर पडत आहे, हे उदाहरणासह दाखवून मूल्यांकन करावे लागते.

२०१८ मध्ये समुद्री पारिस्थितिकीवर आणि मृत क्षेत्रे, तसेच आच्छादन (mantle plume) याची व्याख्या आणि आच्छादन याची प्लेट टेक्टोनिकमध्ये असणारी भूमिका स्पष्ट करा, अशा स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात आले होते.

२०१७ मध्ये आशिया मान्सून आणि लोकसंख्या संबंध, महासागरीय क्षारतेतील फरकाची कारणे सांगा आणि याच्या बहुआयामी परिणामांची चर्चा करा, कोळसा खाणीच्या विकासासाठी असणारी अपरिहार्यता आणि याचे प्रतिकूल पर्यावरणीय परिणाम असे प्रश्न विचारण्यात आलेले होते आणि हे प्रश्न प्राकृतिक भूगोलाची पारंपरिक माहिती आणि चालू घडामोडीचा संबंध जोडून विचारण्यात आलेले होते.

२०१६ मध्ये या घटकातील हिमालय पर्वतातील दरडी कोसळण्याचे प्रमाण अधिक आहे, परिणामकारकरीत्या केलेले जमीन आणि पाणी व्यवस्थापन हे मानवी विपत्ती कमी करू शकते, दक्षिण चिनी समुद्राचे भूराजकीय महत्त्व, भारतातील प्रमुख शहरांमधील पुरांची समस्या, भारतातील अंतर्गत जल वाहतूक व समस्या इत्यादीवर प्रश्न विचारण्यात आलेले होते.

२०१५ मध्ये ''आर्क्टिक समुद्रामध्ये शोधण्यात आलेल्या खनिज तेलाचे आर्थिक महत्त्व काय आहे आणि याचे संभाव्य पर्यावरणीय परिणाम काय असू शकतात.'' असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. आर्क्टिक समुद्राचे भौगोलिक स्थान काय आहे आणि याचा पृथ्वीच्या वातावरणावर नेमका काय परिणाम होतो याची सर्वप्रथम माहिती असणे गरजेचे आहे. त्यानंतर आर्क्टिक समुद्रातील खनिज तेलाचे आर्थिक महत्व माहिती हवे. सद्यस्थितीमध्ये जगातील विविध देशांची उर्जेची गरज भागवण्यासाठी याचा वापर होऊ शकतो आणि आर्क्टिक समुद्रावर अधिपत्य असणाऱ्या देशांना याचा होणारा आर्थिक लाभ आणि ह्या खनिज तेलाचे उत्पादन करताना ह्या समुद्रामध्ये केले जाणारे उत्खनन आणि यामुळे येथील प्रदेशाच्या भौगोलिक रचनेत होणारा बदल आणि या बदलांचा येथील पर्यावरणावर होणारा परिणाम, अशा विविधांगी बाबींचा एकत्रित विचार केल्याशिवाय या प्रश्नाचे योग्य उत्तर लिहिता येणार नाही.

२०१४ मध्ये ''हिमालयातील हिमनद्यांमध्ये होणारी घट आणि भारतीय उपखंडामध्ये जागतिक तपमानवाढीच्या लक्षणाचा संबंध उघड करा.'' असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. या प्रश्नाचे आकलन होण्यासाठी हिमनदी म्हणजे काय, तिची निर्मिती कशी होते, या प्रकारच्या नद्या हिमालय पर्वत रांगांमध्येच का आहेत, याची माहिती सर्वप्रथम असणे गरजेचे आहे. या प्रश्नाचा मुख्य कल हा एका विशिष्ट प्रक्रियेशी म्हणजे जागतिक तपमानवाढीशी जोडण्यात आलेला आहे आणि जागतिक तपमानवाढीमुळे या हिमनद्यांमध्ये कशी घट होत आहे याची पुराव्यानिशी चर्चा करून ह्या प्रश्नाचे उत्तर आपणाला लिहावे लागते.

२०१३ मध्ये 'भूखंड अपवहन सिद्धांताद्वारे तुम्हाला नेमके काय समजते? याच्या समर्थनार्थ प्रमुख पुराव्यानिशी चर्चा करा.' असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. ह्या प्रश्नाचा मुख्य रोख हा भूखंड अपवहन सिद्धांतावर आहे आणि हा प्रश्न योग्य पद्धतीने समजून घेण्यासाठी हा सिद्धांत नेमका काय आहे, या सिद्धांताची मांडणी कोणी केली आणि यामध्ये नेमक्या कोणत्या प्राकृतिक घडामोडींची चर्चा करण्यात आलेली आहे अशा विविधांगी पैलूंचा विचार करून ह्या प्रश्नाचे उत्तर लिहिणे अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रश्नांचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, पर्यावरण आणि हवामान संबंधित घटकांवर अधिक प्रश्न विचारले गेले आहेत. त्याचबरोबर प्रश्न विचारताना या विषयाचे पारंपरिक ज्ञान, यातील महत्त्वाच्या संकल्पना तसेच यासंबंधी घडणाऱ्या चालू घडामोडींचा एकत्रित वापर केलेला दिसून येतो. यातील बहुतांश प्रश्न भारत व जगाच्या प्राकृतिक घडामोडीच्या पार्श्वभूमीचा विचार करून विचारण्यात आलेले आहेत. म्हणून प्राकृतिक भूगोलाची संपूर्ण तयारी करण्याबरोबरच चालू घडामोडींचा अभ्यास करावा लागतो.

थोडक्यात, अभ्यासक्रमामध्ये नमूद घटकाच्या आधारे या प्रश्नांची विभागणी करावी व अभ्यासाची दिशा निर्धारीत करावी. ह्या विषयाच्या स्वतःच्या नोट्स तयार कराव्यात तसेच स्वतःच्या अभ्यासाची तयारी कितपत झालेली आहे, हे कळण्यासाठी उत्तर लेखनाचा सराव करावा व मूल्यमापन करून घ्यावे. त्यामुळे यातील उणिवा दूर करून अधिक नेमकेपणाने उत्तर लिहिण्याचा सराव करता येतो व चांगले गुण प्राप्त करता येऊ शकतात. तसेच महत्त्वाची बाब म्हणजे हा घटक आपणाला सामान्य अध्ययनासाठी तयार करायचा आहे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे नोट्स तयार करताना त्यातील समर्पकता महत्त्वाच्या मुद्यांचा अंतर्भाव करणे अधिक श्रेयस्कर ठरते.

एमपीएससी मंत्र

फारुक नाईकवाडे

अर्थव्यवस्था - चालू घडामोडींचा अभ्यास

मागील लेखामध्ये आर्थिक आणि सामाजिक विकास घटकाच्या मूलभूत व संकल्पनात्मक मुद्यांच्या तयारीबाबत चर्चा करण्यात आली. या लेखामध्ये अर्थव्यवस्था घटकाच्या चालू घडामोडींची तयारी कशी करावी याबाबत चर्चा करण्यात येत आहे.

संकल्पनांच्या आधारे चालू घडामोडींचा अभ्यास करणे हाच अर्थव्यवस्था या विषयाच्या अभ्यासाचा पाया आहे. या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या 'चालू घडामोडी' या विषयाला नेहमीच गतिमान व अद्ययावत ठेवत असतात. त्यामुळे राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या ठळक व महत्त्वाच्या अर्थविषयक घडामोडी, दूरगामी परिणाम करणारे आंतरराष्ट्रीय ठराव, करार, प्रकाशित होणारे नियतकालिक अहवाल, वेगवेगळे जागतिक व राष्ट्रीय पातळीवरील निर्देशांक अभ्यासणे अर्थव्यवस्था विषयाच्या परिपूर्ण तयारीसाठी आवश्यक आहे. याबाबतीत भर द्यायचे मुद्दे कोणते, हे पाहू.

आकडेवारी

- ऊर्जा, कृषी उत्पादन, वेगवेगळ्या क्षेत्रांचा GDP मधील वाटा वरील स्रोतांमधून अभ्यासायचा आहे.
- नवे करांचे दर, नवे व्याजदर, सार्वजनिक वित्तामधील सरकारच्या उत्पन्नाचे स्रोत व त्यांची टक्केवारी आणि खर्चाचे मुद्दे व त्यांची टक्केवारी, परकीय कर्ज इत्यादीबाबतीत अद्ययावत आकडेवारी अर्थसंकल्पातून जमवायची आहे.
- परदेशी व्यापारातील सर्वात मोठे व कमी भागीदार, परकीय गुंतवणूक (सर्वात जास्त व कमी करणारे देश तसेच कोणत्या राज्यात सर्वात जास्त / कमी गुंतवणूक, कोणत्या क्षेत्रात सर्वात जास्त /कमी गुंतवणूक इ.) इत्यादीबाबतची अद्ययावत आकडेवारी माहिती असणे आवश्यक आहे.
- आयात व निर्यातीच्या बाबतीत सर्वात कमी व जास्त अशा बाबी, देश, देशांचे समूह, वस्तू, सेवा, उत्पादने या मुद्यांबाबत पाहायला हव्यात. जागतिक व्यापारातील वाटा हा मुद्दाही उत्पादन सेवांबाबत महत्त्वाचा आहे.
- ही आकडेवारी भारताचा आर्थिक पाहणी अहवाल व महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल यातूनच पाहायची आहे.
- भारताचे इतर देशांशी झालेले महत्त्वाचे आर्थिक करार संबंधित देश व मुख्य तरतुदी अशा कॉलममध्ये तयार करावेत.
- महाराष्ट्रातील काही प्रकल्प, योजना यांसाठी आंतरराष्ट्रीय संस्था / दुसऱ्या देशांशी करार झालेला असल्यास त्याचाही अभ्यास आवश्यक आहे.
- साक्षरता, लोकसंख्येची रचना (वय, लिंग, गुणोत्तर), बाल लिंग गुणोत्तर, नागरी व ग्रामीण लोकसंख्या या मुद्द्यांच्या आधारे देशातील राज्ये व राज्यातील जिल्ह्यांचा तुलनात्मक अभ्यास करायला हवा.
- यामध्ये प्रत्येक मुद्यातील पहिले व शेवटचे तीन घटक, महाराष्ट्राच्या मागची व पुढची राज्ये अशी तथ्ये मांडून नोट्स काढता येतील.
- राज्यातील जिल्ह्यांमध्येही अशा प्रकारेच पहिले व शेवटचे तीन तीन जिल्हे घेऊन नोट्स काढता येतील.
- केंद्र व राज्य सरकारच्या प्रस्तावित / नव्या योजना
- केंद्र व राज्य शासनाच्या विशेष प्रसिद्धी दिल्या जाणाऱ्या योजनांवर भर देऊन आरोग्य, शिक्षण, रोजगार, कृषी, लघु उद्योग, सामाजिक विमा, सामाजिक प्रवर्गांसाठीच्या विशेषतः महिलांसाठीच्या योजना यांचा अभ्यास करावा.
- योजनेचे ध्येय, उद्दिष्टे, स्वरूप, खर्चाची विभागणी, अंमलबजावणी करणारी यंत्रणा, असल्यास लाभार्थ्यांचे निकष, शिफारस करणारा आयोग / समितीचे नाव इ. बाबी प्रस्तावित योजनांच्या संदर्भात पाहाव्यात.

महत्त्वाचे जागतिक अहवाल आणि निर्देशांक

- विविध आंतरराष्ट्रीय अहवालांतील भारताचे, शेजारील देशांचे स्थान (व प्राप्त अंक) आणि या अहवालामधील प्रथम व शेवटच्या स्थानावरील देश माहीत असायला हवेत. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व महाराष्ट्र या तिन्ही पातळ्यांवरील मानव विकास अहवाल (HDI) माहीत असावेत.
- UNO, जागतिक बँक समूह व त्यांच्या सहयोगी संस्थांकडून प्रकाशित होणारे जागतीक भूक निर्देशांक, लिंगभाव असमानता निर्देशांक, ईझ ऑफ डुइंग बिझनेस अहवाल, जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांक, जागतिक जोखीम निर्देशांक अशा निर्देशांकांबाबत अद्ययावत माहिती करून घ्यावी. चालू घडामोडींच्या अद्ययावत संदर्भ साहित्यातून ही आकडेवारी मिळते मात्र यासाठी संबंधित संस्थांचे संकेतस्थळ वापरणे जास्त उपयुक्त ठरते.
- दारिद्र्य/ भूक/ लिंगभाव असमानता/ मानव विकास या निर्देशांकाच्या मापनाची पद्धत, त्यातील घटक यांची माहिती असायला हवी.

महाराष्ट्राचा विशेष संदर्भ

- आयोग जेव्हा महाराष्ट्राचा विशेष संदर्भ म्हणतो, तेव्हा याबाबतीतल्या महाराष्ट्रविषयक अद्ययावत गोष्टी उमेदवाराला माहीत असणे अपेक्षित आहे. ० महाराष्ट्रातील कृषीविषयक बाबी, ग्रामीण, नागरी, पायाभूत सुविधा इ. बाबीसुद्धा चालू घडामोडीच्या अनुषंगाने अभ्यासणे आवश्यक आहे.
- केंद्र किंवा राज्य शासनाकडून प्रस्तावित किंवा मंजूर करण्यात आलेले प्रकल्प, योजना, केंद्र योजना / प्रकल्पातील महाराष्ट्राचा वाटा या बाबी नेमकेपणाने माहित असायला (उदाहरणार्थ महाराष्ट्रातील बुलेट ट्रे प्रकल्प, समृद्धी महामार्ग, इ.) स्मा प्रकल्पातील, स्वच्छ सर्वेक्ष महाराष्ट्राचा परफॉर्मन्स माहीत असाय
- राष्ट्रीय स्तरावरील उत्पादने, सेवा, गुंतवणूक, आयात, निर्यात, इ. बा महाराष्ट्राचा क्रमांक दरवर्षीच्या पाहणी अहवालातून माहीत करून त्याचबरोबर राज्याच्या बरोबर मा पुढील तसेच क्रमवारीमध्ये स्थानावरील राज्ये, इ. बाबी तुल तक्त्यामध्ये नोंदवून पक्क्या कराव्यात
- जनगणना, परकीय गुंतवणूक या मागील वर्षीची तुलना समजून घे निश्चितच उपयोगी ठरते. यामुळे बहु प्रश्नांची तयारी नेमकेपणाने होते.

संदर्भग्रंथः

NCERT अकरावी व बारावीची पाठ्य

भारतीय अर्थव्यवस्था – दत्त व सुंदर रंजन सिंह

आर्थिक पाहणी अहवाल – महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग १ व २ - देसले

यूपीएससीची तयारी

मानवी भूगोल

- श्रीकांत जाधव

प्रस्तुत लेखामध्ये आपण मानवी भूगोल या विषयातील लोकसंख्या भूगोल, वसाहत भूगोल आणि आर्थिक भूगोल या घटकाची परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त तयारी कशी करावी, याबाबत माहिती घेणार आहोत.

२०१३ ते २०२१दरम्यान या घटकावर विचारण्यात आलेले काही प्रश्न व त्यांचे स्वरूप :

२०२१ मध्ये – जगामध्ये खनिज तेलाच्या असमान वितरणाच्या बहुआयामी परिणामांची चर्चा करा. या प्रश्नाचे उत्तर लिहिताना थोडक्यात खनिज तेल जगामध्ये कशा पद्धतीने नैसर्गिकरीत्या उपलब्ध आहे तसेच हे कसे असमान वितरण दर्शिविते हे नमूद करावे लागते आणि परिणामांची चर्चा करावी लागते. या प्रश्नामध्ये बहुआयामी परिणामांची चर्चा करताना आर्थिक भूगोल या विषयाच्या अनुषंगाने करणे आवश्यक आहे.

२०२० मध्ये – भारतात सौर ऊर्जेची अपार क्षमता असूनही प्रादेशिक विकासामध्ये फरक दिसून येतो. विस्तृत वर्णन करा. या प्रश्नाचे उत्तर लिहिताना भारतातील सौर ऊर्जेची जगाच्या तुलनेत असणारी क्षमता, याविषयी थोडक्यात नमूद करून भारतातील प्रदेशनिहाय असणारी सौर ऊर्जेची क्षमता व हा फरक कशामुळे आहे, याविषयी चर्चा करणे अपेक्षित आहे. याच वर्षी भारतातील दशलक्ष शहरे यामध्ये येणारे मोठे महापूर ज्यामध्ये हैदराबाद आणि पुणे या स्मार्ट सिटींचाही समावेश आहे, यासाठीच्या कारणांचा वृत्तांत द्या. चिरस्थायी प्रतिबंधक उपाय सुचवा. या प्रश्नाचे उत्तर लिहिताना भारतातील शहरांचा वेगाने होणारा विस्तार आणि यामुळे नद्यांचा नैसर्गिक प्रवाहांना होणारा अवरोध इत्यादी अनुषंगाने कारणे नमूद करून चर्चा करणे अपेक्षित आहे.

२०१९ मध्ये – प्रादेशिक संसाधनांवर आधारित उत्पादन उद्योग (manufacturing industries) रणनीती भारतात रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यास मदत करू शकते का? हा प्रश्न विचारण्यात आला होता, या प्रश्नाचे उत्तर लिहिण्यासाठी प्रादेशिक संसाधने, उत्पादन उद्योग व भारतातील रोजगार निर्मिती या तिन्ही बाबींची योग्य समज असणे गरजेचे आहे. प्रादेशिक संसाधनांवर आधारित उत्पादन उद्योग भारतातील रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यास मदत करू शकतात का, या महत्त्वाच्या मुद्द्याविषयी उत्तरात लिहिणे अपेक्षित आहे.

२०१८ मध्ये – मत्स्यपालन व याच्याशी संबंधित समस्या औद्योगिक कॉरिडॉर आणि त्याची वैशिष्ट्ये शहरी भाग व पावसाच्या पाण्याची साठवण प्रणाली, भारतीय प्रादेशिक नेव्हिगेशन उपग्रह प्रणाली (IRNSS) इत्यादीवर प्रश्न विचारण्यात आलेले होते.

२०१७ मध्ये – भारतातील येणारे पूर जलसिंचनासाठी शाश्वत स्रोत आणि सर्व प्रकारच्या हवामानामध्ये आंतरदेशीय जलवाहतुकीसाठी कशा प्रकारे रूपांतरित करता येऊ शकतील ? अशा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाचे योग्य आकलन होण्यासाठी पुरे का येतात, याची माहिती जी विषयाच्या पारंपरिक आनुषंगाने माहीत असणे गरजेचे आहे, तसेच याचा विकासासाठी कसा वापर करता येऊ शकतो हे सोदाहरण स्पष्ट करावे लागते.

२०१६ मध्ये – 'सिंधू नदी पाणी कराराची (Indus Water Treaty) माहिती द्या आणि बदलत्या द्विपक्षीय संबंधांच्या पार्श्वभूमीवर याचे पर्यावरणीय, आर्थिक आणि राजकीय परिणामांचे परीक्षण करा.' हा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाचे सरळ दोन भाग पडतात. यातील पहिला भाग सिंधू नदी पाणी करार व यातील तरतुदी याची माहिती आणि दुसरा भाग सद्यःस्थितीतील भारत-पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय संबंधाबाबत आहे. हा प्रश्न चालू घडामोडींशी संबंधित आहे. येथे प्रामुख्याने सिंधू नदीशी संबंधित प्राकृतिक माहिती आणि या दोन देशांमधील संबंध या दोन्हींची सांगड घालून जर हा करार मोडीत निघाला अथवा यामध्ये काही एकतर्फी बदल केले गेले तर याचे नेमके परिणाम काय होऊ शकतात आणि हा प्रश्न भूगोल या घटकाशी संबंधित असल्यामुळे येथे पर्यावरणीय परिणामांची चर्चा करणे अधिक गरजेचे आहे. अशा पद्धतीने या प्रश्नाचे आकलन करून उत्तर लिहिणे क्रमप्राप्त ठरते.

२०१५ मध्ये – 'भारतातील स्मार्ट शहरे, स्मार्ट खेड्यांशिवाय शाश्वत होऊ शकत नाहीत''. या विधानाची ग्रामीण व नागरी एकत्रीकरणाच्या पार्श्वभूमीवर चर्चा करा.' हा प्रश्न विचारण्यात आला होता. हा प्रश्न भारत सरकारने आखलेल्या स्मार्ट शहरे धोरणाशी संबंधित आहे आणि हा प्रश्न भारतातील नागरीकरण आणि ग्रामीण विकास या प्रक्रियेला अधारभूत मानून विचारण्यात आलेला होता. या प्रश्नाची योग्य उकल होण्यासाठी स्मार्ट शहरे ही संकल्पना नेमकी काय आहे आणि स्मार्ट शहरे हे नेमकी कशी असणार आहेत आणि याचा संबंध ग्रामीण भारतातील खेड्यासोबत कशा प्रकारे येणार आहे आणि जर स्मार्ट शहरे हे शाश्वत करावयाची आहेत तर यासाठी स्मार्ट खेड्यांची आवश्यकता का गरजेची आहे. तसेच भारतातील खेडे स्मार्ट बनविण्यासाठी नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत आणि यामुळे ग्रामीण व नागरी एकत्रीकरणाची प्रक्रिया कशी सुरू झालेली आहे, हा मुख्य रोख या प्रश्नाचा होता व या आधारे उत्तर लिहिणे अपेक्षित आहे.

२०१४ मध्ये – 'नैसर्गिक संसाधनाने समृद्ध म्हणून नावारूपाला येणाऱ्या आफ्रिकेतील आर्थिक क्षेत्रामध्ये भारत स्वतःचे स्थान कशा प्रकारे पाहतो ?' हा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाचा कल हा भारताच्या आफ्रिकेविषयी एकत्रित आखल्या गेलेल्या धोरणाचा भाग आहे आणि येथे भारताने आफ्रिका खंडातील विविध देशांसोबत स्थापन केलेले संबंध आणि यातून भारताला होणारा फायदा तसेच आफ्रिका खंड हा नैसर्गिक संसाधनाने समृद्ध असलेला खंड आहे इत्यादी महत्त्वाच्या पैलूंचा एकत्रित विचार करून आफ्रिकेमधील आर्थिक क्षेत्रामध्ये भारत स्वतःचे स्थान कशा प्रकारे पाहतो याची उत्तरामध्ये चर्चा करणे महत्त्वाचे आहे.

२०१३ मध्ये – 'भारतातील सुती उद्योग अत्यंत विकेंद्रित आहे, यासाठी कारणीभूत असलेल्या घटकांचे विश्लेषण करा.' असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. या प्रश्नांची योग्य उकल होण्यासाठी आपणाला भारतातील सुती उद्योग अत्यंत विकेंद्रित आहे यासाठी भारताची प्राकृतिक रचना आणि भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांतील पोषक वातावरण, कच्च्या मालाची उपलब्धता इत्यादीविषयी मूलभूत माहिती असणे गरजेचे आहे आणि या घटकामुळे भारतातील सुती उद्योग कशा पद्धतीने विकेंद्रित झालेला आहे याचे उदाहरणासह विश्लेषण उत्तरामध्ये देणे अपेक्षित आहे.

या घटकाशी संबंधित बहुतांश प्रश्न हे भारताच्या आर्थिक भूगोलशी संबंधित आहेत. तसेच, यातील काही प्रश्न भारत व जगाचा मानवी भूगोल यांचा एकत्रित विचार करून विचारण्यात आलेले आहेत. उपरोक्त प्रश्नांवरून आपणाला या विषयाचे पारंपरिक ज्ञान, यातील महत्त्वाच्या संकल्पना तसेच यासंबंधी घडणाऱ्या चालू घडामोडी इत्यादीची योग्य माहिती असणे गरजेचे आहे, हे लक्षात येते.

एमपीएससी मंत्र

सामान्य विज्ञान

रोहिणी शहा



राज्य सेवा पूर्वपरीक्षेच्या सामान्य अध्ययन या घटकाच्या तयारीबाबत या लेखामध्ये चर्चा करण्यात येत आहे. विज्ञान या घटकाचे योग्य पद्धतीने विश्लेषण करून तयारी केली तर कोणत्याही शाखेच्या उमेदवारांना हा विषय हमखास गुण मिळवून देणारा आहे. पण योग्य दृष्टिकोन नसेल तर विज्ञानाची पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांसाठीसुद्धा हा विषय थोडा अवघडच ठरतो. हा विषय सोपा करून अभ्यासायचा असेल तर मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण आणि राज्य पाठ्य पुस्तक मंडळाची पुस्तके या दोन गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत.

इतर पारंपरिक विषयाच्या तुलनेत विज्ञान या विषयाची प्रश्न विचारण्याची पद्धती, प्रश्नांचा दर्जा यामध्ये एक प्रकारचे सातत्य असल्याने प्रश्नांचा पॅटर्न आणि अपेक्षित प्रश्न शोधणे तुलनेने सोपे असते. या आधारावर पुढीलप्रमाणे तयारी फायदेशीर ठरेल.

भौतिकशास्त्र

प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण केल्यास लक्षात येते की भौतिकशास्त्राच्या संकल्पनांचे उपयोजनावर आधारित असेच प्रश्न विचारण्याचे प्रमाण जास्त आहे. गणितेसुद्धा विचारली जातात आणि त्यामुळे या घटकाची इतर शाखांच्या उमेदवारांना थोडी धास्तीच वाटते. पण अभ्यासक्रमाची नीट विभागणी करून तयारी केल्यास आत्मविश्वास येतो.

बल, दाब, कार्य, ऊर्जा, शक्ती, उष्णता, तापमान, पदार्थाचे अवस्थांतर, मापन पद्धती (राशी व एकके) हे लहान घटक वस्तुनिष्ठ अभ्यासाठी सोपे ठरतात. या घटकांच्या नोट्स ढोबळ मुद्द्यांच्या स्वरूपात पुरेशा ठरतात.

प्रकाश, ध्वनी, भिंग, धाराविद्युत, चुंबकत्व, गती व गतीविषयक समीकरणे हे मोठे व महत्त्वाचे घटक आहेत. यांवर थिअरी, समीकरणे आणि उपयोजित असे सर्व प्रकारचे प्रश्न विचारले जातात. त्यामुळे या मुद्द्यांच्या तयारीसाठी संज्ञा आणि संकल्पनांचे आकलन महत्त्वाचे आहे.

आधी लहान घटकांमधील वस्तुनिष्ठ बाबी व त्यांच्या संकल्पना व्यवस्थित पाठ कराव्यात. त्यांचा मोठ्या घटकांचा अभ्यास करताना प्रत्येक वेळी उपयोग होतो.

रसायनशास्त्र

विज्ञानाच्या इतर घटकांच्या तुलनेत या विषयामध्ये एक शिस्तबद्धता आहे. या विषयावर साधारणपणे ३ ते ६ प्रश्न विचारले जातात आणि तेही वर मांडलेल्या मुद्द्यांवरच! त्यामुळे कमी गुण असले तरी योग्य दृष्टिकोन ठेवून अभ्यास केला तर ते सगळेच मिळविणे शक्य आहे.

द्रव्य, त्यांचे स्वरूप व त्यांच्या अवस्था,



मूलद्रव्ये आणि त्यांची वैशिष्ट्ये, अणूंची संरचना व त्याविषयी विविध शास्त्रज्ञांनी मांडलेले सिद्धांत, अणूंची मांडणी करण्यासाठी बनविलेली आवर्तसारणी व तिच्यामध्ये होत गेलेले बदल, आधुनिक आवर्तसारणी व तिची ठळक वैशिष्ट्ये, काही महत्त्वाच्या मूलद्रव्यांच्या संज्ञा, धातू, अधातू, धातूसदृश धातुके, संयुगे व त्यांची निर्मिती, कार्बनी व अकार्बनी संयुगे, आम्ल, आम्लारी व क्षार तसेच त्यांच्यामधील प्राथमिक अभिक्रिया, मिश्रण व त्यांची निर्मिती

या मुद्द्यांचा त्याच क्रमाने अभ्यास केल्यास त्यांच्यामध्ये असलेल्या परस्पर संबंधांमुळे विषय समजून घेणे आणि लक्षात राहणे सोपे होते. यासाठी राज्य पाठ्यपुस्तक मंडळाची विज्ञान विषयाची जुनी तसेच नवी पुस्तके जास्त उपयोगी ठरतील.

प्राथमिक स्वरुपाच्या अभिक्रिया विचारलेल्या असल्यामुळे हुकमी गुण मिळू शकतात. त्यामुळे अशा अभिक्रिया अभ्यासणे फायद्याचे आहे.

प्रकाश, ध्वनी, भिंग, धाराविद्युत, बल, दाब, कार्य, ऊर्जा, शक्ती या घटकांवर गणिते विचारण्यात येतात. मूलभूत संकल्पना व्यवस्थित समजल्या असतील तर ही गणिते कमी वेळात सोडविता येतात. सरावासाठी पाठ्यपुस्तकामधील उदाहरणे सोडविणे पुरेसे ठरते.

वनस्पती आणि प्राणीशास्त्र

वर्गीकरणाच्या पद्धती व संबंधित शास्त्रज्ञ, विविध संच व विभाग व त्यातील प्राणी/वनस्पती व त्यांची वैशिष्ट्ये हा अभ्यास टेबलमध्ये करावा.

अवयव संस्थांमधील वस्तुनिष्ठ बाबींवरच लक्ष द्यावे. प्रत्येक संस्थेवर किमान १० प्रश्न स्वतः तयार करावेत.

विविध सूक्ष्मजीव, त्यांचे वर्गीकरण, महत्त्वाची वैशिष्ट्ये, त्यांपासून होणारे फायदे-तोटे यांचे एक टेबल करावा.

आरोग्य, रोग निवारण आणि पोषण

यामध्ये पुढील मुद्द्यांच्या आधारे तक्ता बनवून अभ्यास केल्यास सगळ्या संबंधित गोष्टी लक्षात ठेवणे सोपे आणि सोयीचे होते.

रोगांचे प्रकार : जीवणूजन्य, विषाणूजन्य, कवकजन्य, आदिजीवजन्य, संसर्गजन्य, असंसर्गजन्य, लैंगिकदृष्ट्या पारेषित होणारे, आनुवंशिक आजार.

वरील सर्व रोगांची लक्षणे, कारणीभूत घटक, स्रोत, प्रसाराचे माध्यम, बाधित होणारे अवयव, उपचार पद्धती.

स्थूल पोषणद्रव्ये : कर्बोदके, प्रथिने, मेद या तिन्ही स्थूल पोषणद्रव्यांपासून मिळणारी ऊर्जा, त्यांचे महत्त्वाचे घटक, कमतरता व आधिक्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या इ. मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करावा.

सूक्ष्म पोषणद्रव्ये : जीवनसत्वे, खनिज व क्षार या पोषण द्रव्यांचा स्रोत, शरीरावरील त्यांचे परिणाम, कमतरता व आधिक्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, ठरावीक जीवनसत्त्वांचे इंग्रजी नाव व त्या जीवनसत्त्वाचा महत्त्वाचा घटक याची माहिती असायला हवी.

चालू घडामोडी

- या घटकाच्या पुढील मुद्द्यांबाबत अद्ययावत माहिती असायला हवी.
  आरोग्य, पोषण, पर्यावरणाशी संबंधित शाश्वत विकास उद्दिष्टे आणि त्याबाबत भारतातील उपक्रम
- याबाबतचे WHO व इतर संघटनांचे निर्देशांक
- राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत असलेला रोग, त्याचे उगम स्थान, प्रसार, उपचारासाठीचे प्रयत्न
- आरोग्य व पोषणाबाबतच्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या महत्त्वाच्या तरतुदी
- विज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार
- विज्ञान क्षेत्रातील नवे शोध व चर्चेतील संशोधने
- विज्ञानमधील मूलभूत संकल्पना, त्यांचे निष्कर्ष सहजासहजी बदलत नाहीत म्हणून काही नवे संशोधन सोडल्यास अभ्यासक्रमामध्ये दिले गेलेले सैद्धांतिक विज्ञान योग्यरीतीने समजून घेतले तर इतर विषयांपेक्षा जास्त आत्मविश्वास या घटकाबाबत येतो. म्हणूनच या घटकाची तयारी करताना पाठांतराऐवजी संकल्पना समजून घेण्यावर भर द्यावला हवा.

यूपीएससीची तयारी

भूगोल आणि इतर विषय - एक आढावा

- श्रीकांत जाधव

प्रस्तुत लेखामध्ये भूगोल या विषयाचा सामान्य अध्ययन पेपर तीनमधील आर्थिक विकास आणि जैवविविधता व पर्यावरण इत्यादी अभ्यासक्रमामध्ये नमूद विषयासोबत कसा संबंध येतो, याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करणार आहोत. त्यामुळे अभ्यासाचे नियोजन अधिक नेमकेपणे करता येऊन विषयाची सर्वांगीण तयारी करता येईल. भूगोल या विषयातील पर्यावरण भूगोल हा विषय पेपर एकमध्ये अभ्यासताना मुख्यत्वे पर्यावरण परिस्थितीकी, प्रदेशनिहाय जैवविविधता तसेच याचे प्रमाण, त्याचबरोबर त्याच्याशी संबंधित संकल्पना, त्यांची वैशिष्टे, हरितगृह परिणाम आणि जागतिक तापमानवाढ यासाठी कारणीभूत असणारे नैसर्गिक व मानवी घटक, वाढते शहरीकरण त्यामुळे पर्यावरणावर होणारा परिणाम, जंगलांचा होणारा ऱ्हास तसेच या कारणास्तव निर्माण झालेल्या समस्या आणि एकूणच याचा होणारा एकत्रित परिणाम या सर्व घटकांचा जगाच्या आणि भारताच्या भूगोलात विचार करावा लागतो आणि याच्याशी संबंधित माहिती सखोलपणे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. या घटकांचा अभ्यास कसा करावा याची माहिती आपण मागील लेखांमध्ये सविस्तरपणे घेतलेली आहे. सामान्य अध्ययनमधील बहुतांश घटकांचा परस्पर संबंध येतो, हे खालील प्रश्नांवरून लक्षात येते.

२०२१ मध्ये जगामध्ये खनिज तेलाच्या असमान वितरणाच्या बहुआयामी परिणामांची चर्चा करा. या प्रश्नाच्या उत्तरात बहुआयामी परिणामांची चर्चा करताना आर्थिक भूगोल या विषयाच्या अनुषंगाने करणे आवश्यक आहे.

२०२० मध्ये 'हिमालयामधील हिमनद्यांचे वितळणे भारताच्या जल संसाधनावर कशाप्रकारे दूरगामी परिणाम करणारे आहे?' असाही प्रश्न विचारण्यात आलेला होता. याच वर्षी भारतातील दशलक्ष शहरे यामध्ये येणारे मोठे महापूर ज्यामध्ये हैदराबाद आणि पुणे या स्मार्ट सिटींचाही समावेश आहे, यासाठीच्या कारणांचा वृत्तान्त द्या.

२०१९ मध्ये प्रादेशिक संसाधनावर आधारित उत्पादन उद्योग (manufacturing industries) रणनीती भारतात रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यास मदत करू शकते का?

२०१६च्या मुख्य परीक्षेत भारतातील प्रमुख शहरामधील पुराची समस्या, भारतातील अंतर्गत जल वाहतूक व समस्या इत्यादीवर प्रश्न विचारण्यात आलेले होते.

२०१५च्या मुख्य परीक्षेत ''मुंबई, कोलकाता आणि दिल्ली ही देशातील तीन महानगरे आहेत, पण यामध्ये दिल्लीतील वायू प्रदूषण हे मुंबई व

कोलकाता या महानगरांच्या तुलनेत अधिक असून ती एक गंभीर समस्या आहे व हे असे का आहे. 'भारतातील स्मार्ट शहरे, स्मार्ट खेड्यांशिवाय शाश्वत होऊ शकत नाहीत''.या विधानाची ग्रामीण व नागरी एकत्रीकरणाच्या पार्श्वभूमीवर चर्चा करा.

२०१३ च्या मुख्य परीक्षेत ''दक्षिण भारतातील राज्यांमध्ये नवीन साखर उद्योग स्थापन करण्याचा कल वाढत आहे. याच्याशी तुम्ही सहमत आहात का? समर्थनासह चर्चा करा.

वरीलप्रमाणे प्रश्न विचारण्यात आले होते. आता वरील प्रश्नांचा संबंध पेपर ३ इतर घटकांशी कसा आहे, तो पुढे पाहूया.

सामान्य अध्ययन पेपर तीनमधील आर्थिक विकास व पर्यावरण या घटकासोबतचा संबंध

आर्थिक विकासाअंतर्गत देशाच्या विविध भागांत घेतली जाणारी महत्त्वाची पिके व पीक पद्धती, शेती उत्पादन, प्राणी संगोपन, अर्थशास्त्र, सिंचनाचे प्रकार आणि दळणवळण इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. याकरिता आपल्याला आर्थिक भूगोल हा विषय अभ्यासावा लागतो आणि या विषयाच्या मूलभूत माहितीची तोंडओळख करून घ्यावी लागते. अर्थात, यामुळे या घटकाची परीक्षेच्या दृष्टीने योग्य तयारी करण्यासाठी मदत होते. या घटकावर विचारण्यात येणारे प्रश्न हे बहुतांशी प्रमाणात भारताच्या आर्थिक भूगोलाशी संबंधित असतात व याच्या मूलभूत माहितीचा अभ्यास सामान्य अध्ययन पेपर एकमधील भूगोल विषयातील आर्थिक भूगोलामध्ये झालेला असतो. या माहितीचा वापर करून पेपर तीनमधील प्रश्न अधिक समर्पकरीत्या सोडवता येऊ शकतात. पण अशाप्रकारे माहितीचा वापर करताना पेपर तीनमध्ये आर्थिक पैलूंचा विशेषकरून अधिक विचार करणे अपेक्षित असते याचे भान ठेवावे लागेल. थोडक्यात, जरी मूलभूत माहितीची परिभाषा एकसारखी असली तरी उत्तरे लिहिताना पेपरनिहाय लागणारा दृष्टिकोन भिन्न-भिन्न असतो.

सध्या जागतिक तापमानवाढ, जैवविविधतेचा होणारा ऱ्हास, शहरीकरण, उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये होणारी घट, सतत वाढणारी लोकसंख्या आणि यासाठी कारणीभूत असणारे नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटक यासंबंधी सतत काही घटना घडत असतात. ही माहिती आपल्याला परीक्षेच्या दृष्टीने नोट्स स्वरूपात संकलित करावी लागते. या माहितीचा उपयोग सामान्य अध्ययनमधील संबंधित विषयाचा सखोल आणि सर्वांगीण पद्धतीने तयारी करण्यासाठी उपयोग करता येऊ शकतो. या घटकाचा समावेश हा सामान्य अध्ययन पेपर तीनमधील - जैवविविधता आणि पर्यावरण अंतर्गत नैसर्गिक संवर्धन, पर्यावरणीय

प्रदूषण आणि अधःपतन, पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन या घटकांच्या अभ्यासक्रमामध्ये केलेला आहे. हे घटक पर्यावरण भूगोल विषयाशी संबंधित आहेत, पण पेपर तीनमध्ये या घटकाचा अभ्यास करताना मुख्यत्वे मानवी हस्तक्षेपामुळे या गोष्टीवर कोणते परिणाम झालेले आहेत. तसेच यासाठी कोणत्या उपाययोजना आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर केलेल्या आहेत याची माहिती असणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने भारत सरकारने आखलेल्या उपाययोजना, नैसर्गिक संवर्धन, पर्यावरणीय प्रदूषण आणि अधःपतन यासाठी पारित करण्यात आलेले महत्त्वाचे कायदे त्याचबरोबर यात भारताची नेमकी भूमिका काय आहे, याची सविस्तर माहिती ठेवावी लागते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी केल्या गेलेल्या उपाययोजना आणि कायदे माहिती असणे गरजेचे आहे. या माहितीसाठी वर्तमानपत्रे, मासिके तसेच सरकारमार्फत वेळोवेळी जाहीर होणाऱ्या योजना, कायदे यासारख्या स्रोतांचा उपयोग करता येऊ शकेल. या घटकाचा पारंपरिक अभ्यास पर्यावरण भूगोलामध्ये झाल्यामुळे या विषयाशी संबंधित चालू घडामोडींची समज अधिक योग्यरीत्या करता येते.

उपरोक्त नमूद केलेल्या घटकांसाठी सामान्य अध्ययनातील पेपरनुसार जो दृष्टिकोन वापरावा लागतो त्यामध्ये भिन्नता येते. त्यामुळे सर्वप्रथम प्राथमिक माहितीचा अभ्यास करून घ्यावा लागतो. त्यासाठी आर्थिक भूगोल आणि पर्यावरण भूगोल हे विषय अभ्यासावे लागतात. त्याचबरोबर सामान्य अध्ययन पेपर तीनमधील उपरोक्त नमूद घटकांवर विचारण्यात येणारे प्रश्न हे विषयाच्या पारंपरिक ज्ञानापेक्षा चालू घडामोडींशी अधिक संबंधित असतात. असे असले तरी विषयाच्या पारंपरिक ज्ञानाची सखोल माहिती असल्याशिवाय प्रश्नांची उत्तरे प्रभावीपणे लिहिता येत नाहीत. सामान्य अध्ययन पेपर एकमधील भूगोल या विषयामुळे पर्यावरण आणि आर्थिक भूगोलाच्या मूलभूत माहितीचा अभ्यास झालेला असल्यामुळे संबंधित घटकाच्या चालू घडामोडींचा समावेश करून सर्वांगीण पद्धतीने परीक्षाभिमुख तयारी करता येऊ शकते.

राज्य सेवा पूर्वपरीक्षा

चालू घडामोडी

एमपीएससी मंत्र

फारुक नाईकवाडे

'चालू घडामोडी' या घटकाच्या अभ्यासाची व्याप्ती पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तीनही टप्प्यांवर व्यापलेली आहे. हा घटक विषय काही प्रमाणात स्वतंत्र तर बऱ्याच प्रमाणात अभ्यासक्रमांतील इतर घटक विषयांशी अनिवार्यपणे जोडलेला घटक आहे. म्हणून चालू घडामोडी हा अभ्यासाचा बेस बनला पाहिजे. प्रश्नपत्रिकांच्या विश्लेषणाच्या आधारे या घटकाची तयारी करताना पुढील मुद्दे लक्षात घ्यावेत :

■ जागतिक चालू घडामोडी :

यामध्ये क्रीडा, पुरस्कार, संमेलने, विज्ञान, व्यक्तिविशेष याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या बाबी येतात.

विश्वचषक, ऑलिम्पिक, आशियाई स्पर्धा, इतर महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, त्यातील विक्रम, भारत / महाराष्ट्र यांची कामगिरी यांचा आढावा घ्यायला हवा.

साहित्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पुरस्कार, चर्चेतील महत्त्वाची पुस्तके व त्यांचे लेखक, चर्चेतील लेखकांबाबतच्या महत्त्वाच्या बाबी पाहाव्यात.

चित्रपट, संगीत, पत्रकारिता, प्रशासन, संशोधन, शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त व्यक्ती माहीत असाव्यात. भारतातील व्यक्तींना हे पुरस्कार मिळाले असल्यास त्यांच्याबाबतची अतिरिक्त माहिती असणे आवश्यक आहे.

महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संस्था तसेच संघटना यांची स्थापना, उद्देश, ठळक कार्ये, ब्रीदवाक्य, त्याचा भारत सदस्य केव्हा झाला, भारताची संघटनेतील भूमिका, संघटनेचा नवीन ठराव किंवा इतर चर्चेतील मुद्दे या आधारावर तयारी करावी.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे निर्देशांक व त्यातील भारताचे स्थान, निर्देशांक / अहवाल प्रकाशित करणारी संस्था / संघटना, महत्त्वाच्या निर्देशांकांचे निकष, त्यातील भारताचे अद्ययावत व मागील वर्षीचे स्थान हे मुद्दे लक्षात घ्यावेत.

■ भारतातील चालू घडामोडी :

शासकीय योजनांचे उद्दिष्ट, सुरू झालेले वर्ष, तरतुदी, लाभार्थ्यांचे निकष, अंमलबजावणी यंत्रणा, असल्यास अपवाद, असल्यास कालमर्यादेतील उद्दिष्टे यांचा टेबलमध्ये नोट्स काढून अभ्यास करावा. यामध्ये नव्या योजनांवर भर द्यायला हवा. मात्र मागील पाच ते सात वर्षांमधील योजनांचा समावेश केल्यास उत्तम.

संरक्षण घटकामध्ये पारंपरिक आणि अद्ययावत असे दोन्ही मुद्दे विचारण्यात येतात. त्यामुळे भारतातील क्षेपणास्त्रे, रणगाडे, लढाऊ विमाने, पाणबुड्या, युद्धनौका, रडार व इतर यंत्रणा यांचे नाव, प्रकार, वैशिष्ट्ये, वापर, असल्यास अद्ययावत चाचणीचे परिणाम, भारतात विकसित करणारी संस्था किंवा विदेशातून आयात केले असल्यास सबंधित देश व कंपनी या मुद्द्यांच्या आधारे टेबलमध्ये नोट्स काढाव्यात.

भारताचे शेजारी देशांशी असलेले विवाद किंवा नवे संयुक्त प्रकल्प दोन्हीचाही परिपूर्ण आढावा घेणे आवश्यक आहे. तसेच इतर देशांशी भारताने संयुक्तपणे सुरू केलेले प्रकल्प, युद्धाभ्यास यांचाही आढावा घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, त्यातील विजेते, महाराष्ट्राची कामगिरी यांचा आढावा घ्यायला हवा.

राष्ट्रीय स्तरावरील साहित्य, चित्रपट, संगीत, पत्रकारिता, प्रशासन, शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार तसेच पद्म पुरस्कार, शौर्य पुरस्कारप्राप्त व्यक्ती माहीत असाव्यात.

महाराष्ट्र शासनाचे विविध पुरस्कार, राज्य स्तरावरील महत्त्वाची संमेलने यांची माहिती असायला हवी.

चर्चेतील व्यक्ती, त्यांचे कार्यक्षेत्र, नियुक्त्या, निवड, बढती यांचा आढावा घ्यायला हवा.

■ सामान्य अध्ययन घटकांशी संबंधित चालू घडामोडी :

यामध्ये निवडणूका, नवीन विधेयके, धोरणे, कायदे या राज्यव्यवस्था घटकाशी संबंधित बाबी पाहायला हव्यात. भारताचे द्विपक्षीय तसेच संघट्ना सदस्य म्हणून आंतरराष्ट्रीय संबंध या घटकाचा भाग आहेत. शासकीय धोरणे व चर्चेतील महत्त्वाचे निर्णय यांमधील महत्त्वाच्या तरतूदी समजून घ्याव्यात. नवीन धोरणांशी संबंधित आधीच्या धोरणांचा आढावा घेता आल्यास उत्तम.

पर्यावरणाशी संबंधित वन अहवाल, प्रदूषणाशी संबंधित निर्देशांक, हवामान बदलाशी संबंधित अद्ययावत घडामोडी, संमेलने व त्यातील ठराव, IUCNच्या याद्यांमध्ये समाविष्ट भारतातील प्रजाती, असल्यास हरित न्यायाधिकरणाचे चर्चेतील निर्णय यांचा आढावा घ्यावा.

अर्थव्यवस्था घटकाच्या चालू घडामोडींचा अभ्यास कशा प्रकारे करावा याबाबत स्वतंत्र लेखामध्ये याआधी चर्चा करण्यात आली आहे.

खगोलशास्त्रीय शोध, वैज्ञानिक शोध, तंत्रज्ञानविषयक अद्ययावत माहिती, भारताचा सहभाग असलेले महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय प्रकल्प यांचा आढावा घ्यावा.

साथीचे रोग, त्यावरचे उपाय, जागतिक आरोग्य संघटनेच्या महत्त्वाच्या घोषणा यांचा आढावा घ्यायला हवा.

■ सामान्य ज्ञान स्वरूपाची माहिती

खेळांचे नियम, लोकपरंपरा, सर्वांत मोठे / लहान भौगोलिक क्षेत्र, शहरांची उपनावे, प्रसिद्ध व्यक्तींची अवतरणे अशासारखे मुद्दे विचारले जाऊ शकतात.

चालू घडामोडींची व्याप्ती फार आहे असे समजून गोंधळ आणि भीती वाढवून घेण्यापेक्षा या घटकावरील प्रश्नांचे योग विश्लेषण करून आपला अभ्यास योग्य दिशेने होईल याची काळजी घेतली पाहिजे. योग्य दिशेने अभ्यास करण्यासाठी प्रश्नांचे नेमके स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे नियमित वाचन आणि विश्लेषण करायला हवे. प्रश्नांचे स्वरूप लक्षात आले की, नेमके काय वाचायला हवे, ते कळते. वृत्तपत्रांतील 'बातमी' आणि स्पर्धा परीक्षेविषयी आवश्यक 'माहिती' यामध्ये फरक आहे हे तयारी करणाऱ्या उमेदवारांना माहीत असले पाहिजे.

अभ्यास नेमका काय करायचा, कशाचा करायचा आणि कोणत्या संदर्भ साहित्यातून करायचा हा अभ्यास म्हणजे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास. एखाद्या घडामोडीची माहिती वेगवेगळ्या दोन-तीन संदर्भ पुस्तकात पाहिली की संभ्रम वाढतो असा अनुभव बरेच वेळा उमेदवारांना येत असतो. पण एकच स्रोत हाताळून गोंधळ कमी होईल असे नक्कीच नाही. त्यामुळे रेडीमेड संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यापूर्वी शासनाकडून प्रकाशित झालेले अहवाल, शासनाची संकेतस्थळे यांचा आधी वापर करावा आणि उर्वरित मुद्द्यांसाठी किमान दोन संदर्भ वापरून माहितीची पडताळणी करून मगच चालू घडामोडींच्या नोट्स काढणे आवश्यक आहे.

संदर्भ साहित्य:

- इंडिया इयर बुकमधील प्रकरणे
- केंद्र व राज्याचा अर्थिक पाहणी अहवाल व अर्थसंकल्प
- योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य वर्ल्ड फोकस, इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली ही नियतकालिके
- द हिंदू व लोकसत्ता किंवा कोणतेही एक इंग्रजी व मराठी वृत्तपत्र
- बाजारात उपलब्ध असलेले चालू घडामोडींचे संकलन

लोकसत्ता

यूपीएससीची तयारी

- प्रवीण चौगले

भारताचे संविधान



प्रस्तुत लेखात आपण यूपीएससी मुख्य परीक्षेतील सामान्य अध्ययन पेपर २ चा अभ्यासक्रम व या पेपरच्या तयारीकरिता आवश्यक रणनीती, अभ्यास साहित्य इत्यादी बाबींवर चर्चा करणार आहोत. या पेपरमध्ये संविधान, राज्यव्यवस्था, सामाजिक न्याय, कारभार प्रक्रिया व आंतरराष्ट्रीय संबंध या पाच प्रमुख अभ्यासघटकांचा समावेश आहे.

भारतीय संविधान हा या पेपरच्या अभ्यासघटकाचा गाभा आहे. भारतीय संविधान हा घटक केवळ पूर्वपरीक्षेकरिताच महत्त्वाचा नसून मुख्य परीक्षेतही त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संविधान या घटकाची तयारी करण्यासाठी आपल्याला यामध्ये समाविष्ट उपघटक कोणते आहेत, भारतातील संविधान निर्मितीचा इतिहास इत्यादी बाबी जाणून घ्याव्या लागतील. ब्रिटिश राजवटीमध्ये भारतात राज्यघटनेच्या विकासाला प्रारंभ झाला. ब्रिटिशांनी १७७३ साली लागू केलेला नियामक कायदा ते अगदी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ पर्यंत केलेले विविध कायदे, भारताच्या स्वातंत्र्यलढ्या दरम्यान भारतीय नेत्यांनी भविष्यातील भारतासाठी राज्यघटना कशी असावी यासाठी केलेले प्रयत्न जाणून घेणे आवश्यक ठरते. यामध्ये नेहरू रिपोर्टविषयी माहीत असणे आवश्यक ठरते. यासोबतच संविधान सभा निर्मितीची पार्श्वभूमी, उद्दिष्टांचा ठराव, संविधान सभेतील चर्चा, संविधान निर्मितीच्या वेळी संविधानात समाविष्ट केल्या जाणाऱ्या तरतुदींविषयी असणारी मत-मतांतरे, घटनेची स्वीकृती तसेच २६ जानेवारी १९५० मध्ये संविधान अमलात येईपर्यंत भारतामध्ये कशाप्रकारे संविधानिक विकास होत गेला याचा मागोवा घेणे हे परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. जगातील इतर संविधानांचा देखील भारतीय संविधान निर्मितीवर प्रभाव आढळतो. घटनाकारांनी अन्य देशांच्या संविधानामधील सर्वोत्तम भाग एकत्र केले, हे करत असताना त्यांनी भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन भारताकरिता अनुरूप तरतुदी तसेच १९३५ च्या कायद्यातील आवश्यक प्रशासकीय तपशील इत्यादी बाबी घेतल्या. यामुळे भारताचे संविधान जगातील सर्वात मोठे संविधान बनले. राज्यघटना निर्मितीसाठी सुमारे २ वर्ष ११ महिने १७ दिवस इतका कालावधी लागला. घटना स्वीकारली त्यावेळी घटनेत २२ भाग ३९५ कलमे आणि ८ अनुसूची यांचा समावेश होता. लिखित व विस्तृत संविधान, घटना दुरुस्ती प्रक्रियेतील ताठरता व लवचीकता यांचा मेळ, सार्वभौमत्व, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक, संघराज्य, आणीबाणीची तरतूद, मूलभूत अधिकार, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, स्वतंत्र न्याय मंडळ, एकेरी नागरिकत्व, त्रिस्तरीय शासन इत्यादी घटनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

राज्यघटनेचा अभ्यास करताना सर्वप्रथम 'सरनामा' समजून घेणे महत्त्वाचे असते. कोणत्याही राज्यघटनेची उद्दिष्टे व ध्येये सरनाम्यामध्ये स्पष्ट केलेली असतात. म्हणून सरनाम्यास 'उद्देश पत्रिका' असेही म्हणतात. पंडित ठाकुरदास भार्गव यांच्या मते, सरनामा हा घटनेचा आत्मा आहे. भारतीय सरनाम्यातून अधिसत्तेचा स्त्रोत, राज्य व्यवस्थेचे स्वरूप आणि राज्यव्यवस्थेची उद्दिष्टे स्पष्ट होतात. सरनाम्यामध्ये प्रथम १९७६ साली घटनादुरुस्ती झाली. या ४२व्या घटना दुरुस्तीद्वारे सरनाम्यामध्ये काही शब्द समाविष्ट केलेले गेले. सरनाम्याचे अध्ययन करताना यामध्ये समाविष्ट धर्मनिरपेक्षता लोकशाही, समाजवाद, सार्वभौमत्व इत्यादी संकल्पना सखोलपणे जाणून घेणे आवश्यक ठरते. कारण या संकल्पनांवर आधारित प्रश्न परीक्षेमध्ये विचारले जाऊ शकतात. या संकल्पनांबरोबरच सरनाम्याशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाचे खटले अभ्यासणे आवश्यक ठरते. बहुतांश महत्त्वाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यामध्ये सरनाम्याचा संबंध आला आहे. उदा. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रथमच सरनामा भारतीय राज्यघटनेचा एक भाग आहे असे नमूद केले. २०२१च्या मुख्य परीक्षेमध्ये खालील प्रश्न विचारण्यात आला. सदर प्रश्न राज्यघटनेमध्ये अंतर्निहित असणाऱ्या तत्त्वांशी संबंधित आहे.

Q. Constitutional morality is rooted in the constitution itself and is founded on its essential assets explain the doctrine of constitutional morality with the help of relevant judicial decisions. (150 words,10 marks)



भारतीय राज्यघटनेमध्ये सरनामा, मूलभूत अधिकार, राज्याची मार्गदर्शक धोरणे, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये इत्यादींमध्ये संविधानिक नैतिकतेचा अंतर्भाव दिसतो. संविधानिक नैतिकता ही यशस्वी लोकशाहीची एक महत्त्वपूर्ण पूर्वअट आहे. ज्या समाजातील लोक तसेच राजकीय नेतृत्व संविधानिक नैतिकतेचे पालन करत नसतील अशा देशात लोकशाही टिकू शकत नाही. कायद्याचे राज्य (Rule of law), व्यक्तिगत स्वातंत्र्य, समानतेचा हक्क, अभिव्यक्ती व निवडीचे स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, कायद्याने प्रस्थापित केलेली प्रक्रिया (Due process of law) इत्यादी स्थापित तत्त्वांमधून संविधानिक नैतिकता दिसून येते. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या केशवानंद भारती खटला, नाज फाउंडेशन खटला, शबरीमाला खटला इत्यादींमधून वेळोवेळी संविधानिक नैतिकतेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर प्रश्नाचे उत्तर लिहिताना संविधानिक नैतिकता म्हणजे काय आहे हे आधी स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यांच्या पार्श्वभूमीवर सदर तत्त्व स्पष्ट करावे. यामध्ये समर्पक उदाहरणांचा वापर करणे आवश्यक आहे. उत्तराच्या शेवटी संविधानिक नैतिकतेचे महत्त्व विषद करून संविधानिक नैतिकतेचे पालन करणे ही जनतेचीसुद्धा जबाबदारी आहे असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

२०१६ यावर्षी मुख्य परीक्षेत सरनाम्याविषयी एक प्रश्न विचारला गेला. तो खालील प्रमाणे

Q. Discuss each adjective attached to the word 'Republic' in the 'Preamble'. Are they defendable in the present circumstances? (250 words)

या प्रश्नावरून एक बाब स्पष्ट होते की, संविधानातील प्रमुख तरतुदी आणि त्या तरतुदींशी संबंधित संकल्पना यांचे सखोल आकलन करून घेणे महत्त्वाचे ठरते. याकरिता फक्त संविधानातील सर्व अनुच्छेद वाचले म्हणजे परीक्षेची परिपूर्ण तयारी होते या भ्रमामध्ये परीक्षार्थींनी राहू नये. कारण परीक्षेमध्ये येणाऱ्या प्रश्नांचे स्वरूप हे त्या संकल्पना किंवा तरतुदीच्या विविध पैलूंवर विचारले जातात. भारतीय संविधान या विषयाची तयारी करण्यासाठी Constitution at work हे एनसीईआरटीचे क्रमिक पुस्तक मूलभूत वाचनासाठी उपयुक्त ठरते. याव्यतिरिक्त इंडियन पोलिटी - एम. लक्ष्मीकांत हा संदर्भ ग्रंथ सखोलपणे अभ्यासणे क्रमप्राप्त आहे. तसेच भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया (खंड १) हा तुकाराम जाधव आणि महेश शिरापूरकर लिखित ग्रंथ वाचा. भारतीय संविधान हा घटक किंवा यातील तरतुदी हा भाग पारंपरिक स्वरूपाचा असला तरी परीक्षेत येणारे प्रश्न हे समकालीन घडामोडींना जोडून विचारले जातात. याकरिता द इंडियन एक्स्प्रेस, द हिंदू ही वृत्तपत्रे, सरकारची संकेतस्थळे इत्यादी बाबी वारंवार पाहणे महत्त्वाचे ठरते. संविधानाचा अभ्यास करताना सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे विविध संकल्पना व त्यांचा अर्थ स्पष्टपणे समजून घेणे ही आहे, तरच आपली तयारी परिपूर्ण होऊ शकते.

लोकसत्ता

एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

राज्य सेवा पूर्वपरीक्षा

सामान्य अध्ययन पेपर दोन - सी सॅट

राज्य सेवा पूर्वपरीक्षा सामान्य अध्ययन पेपर-२ या पेपरला सी सॅट (C-SAT) असेही म्हटले जाते. नागरी सेवा अभिवृत्ती चाचणी असा या लघुरूपाचा अर्थ होतो. म्हणजेच उमेदवार ज्या सेवेमध्ये प्रवेश घेऊ इच्छित आहे तिथल्या कामाच्या स्वरूपास त्याची अभिवृत्ती कितपत मिळतीजुळती आहे हे तपासणारा असा हा पेपर आहे. उमेदवारांची तर्क करण्याची, विश्लेषण करण्याची व निर्णय घेण्याची क्षमता तसेच त्यांचे आकलन या पेपरमधून तपासले जाते.

पाठांतराच्या वा स्मरणशक्तीच्या आधारावर या पेपरमधील प्रश्नांची उत्तरे देणे शक्य नाही. ऐनवेळी समोर आलेल्या प्रश्नांना विचारपूर्वक प्रतिसाद द्यायचा असतो. त्यामुळे हा पेपर एकपेक्षा जास्त अवघड, जास्त आव्हानात्मक समजला जातो. पेपरचे व प्रश्नांचे हे स्वरूप लक्षात घेता २०० गुणांच्या या पेपरमध्ये प्रत्येकी २५ गुणांसाठी एकूण ८० प्रश्न विचारण्यात येतात.

मागील वर्षांच्या उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण उमेदवारांच्या गुणांचे आणि त्यांनी सोडविलेल्या प्रश्नांचे विश्लेषण केल्यावर पुढील बाबी लक्षात येतात.

निगेटिव्ह मार्किंगच्या हिशोबाने ठराविक गुण मिळविण्याचे उद्दीष्ट ठरवणा-या आणि त्यासाठी किती प्रश्न सोडविणे आवश्यक आहे याचे गणित लक्षात घेऊन पेपर सोडविणा-या उमेदवारांना तुलनेने कमी प्रश्न सोडवूनही चांगले गुण मिळतात.

जास्तीत जास्त पेपर कव्हर करण्याचे उद्दिष्ट ठेवून पेपर सोडविणाऱ्या विद्यार्थ्यांकडून क्षुल्लक प्रकारातील चुका जास्त होतात आणि जास्त प्रश्न सोडवूनही नकारात्मक गुणपद्धतीमुळे गुण खूप कमी होतात.



ठरावीक गुणांचे उद्दीष्ट ठरविले की किती प्रश्न सोडवायचे याची मर्यादा आखून घेता येते. आणि ताण कमी होऊन नकारात्मक गुण ओढवून घेणा-या सिली मिस्टेक्स टाळता येतात.

एकूण ८० पैकी निर्णय क्षमतेचे सर्व ५ प्रश्न आणि बाकीच्या ७५ पैकी ५० ते ५५ प्रश्न सोडविणे हे उद्दिष्ट असायला हरकत नाही. मात्र अचूकपणे सोडविता येणाऱ्या प्रश्नांचे प्रमाण सरावाने वाढविणे आवश्यक आहे.

ज्या उमेदवारांनी आपल्या सरावाचे विश्लेषण करून आपले कम्फर्ट झोन आणि आव्हानात्मक वाटणारे प्रश्नप्रकार शोधले आणि त्यावर आधारित सराव केला त्यांना सी सॅट पेपरमध्ये चांगले गुण मिळाले आहेत.

या पेपरमध्ये जास्तीत जास्त मार्क मिळवायचे असतील तर सरावाशिवाय पर्याय नाही. हा सराव केवळ बरोबर उत्तरे शोधण्यापुरता मर्यादित असून चालणार नाही. वेळेचे नियोजन करून बरोबर उत्तरे शोधण्याचे तंत्र आत्मसात करावे लागेल.

प्रश्नांचे स्वरूप ओळखीचे होईपर्यंत वेळ न लावता ते सोडवण्याचा प्रयत्न करणे आणि एकदा प्रश्नप्रकार ओळखीचा झाला की मग वेळ लावून कमीत कमी वेळेत तो सोडविण्याचा सराव करणे अशी तयारी जास्त परिणामकारक ठरते.

सरावासाठी सर्वांत सोपा आणि परिणामकारक पर्याय म्हणजे मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका. यांच्या सरावातून कोणत्या घटकावर आपले प्रभुत्व आहे, कोणता घटक अजून तयारी केल्यास जमू शकतो, कोणता घटक खूपच अवघड वाटतो या बाबी व्यवस्थित समजून घेता येतील आणि तयारीची दिशा ठरविण्यास मदत होईल.

सरावामध्ये सर्वांत आधी थोड्या फार तयारीने आत्मविश्वास वाढू शकेल अशा घटकांची तयारी करावी. त्यानंतर आत्मविश्वास असलेल्या घटकांचा सराव करावा. पेपर दोनमध्ये ५६ पानी पेपर आणि ऐनवेळी आकलन व विश्लेषण करून सोडविण्याचे प्रश्न असे स्वरूप आहे. त्यामुळे खूपच कठीण वाटणारे प्रश्न ऐनवेळच्या तयारीचा भाग होऊ शकत नाहीत. अशा घटकांसाठी थोडा जास्त वेळ लागतो. त्यांचा समावेश दीर्घकालीन व्यवस्थापनामध्ये असणे आवश्यक असते.

जितका पेपर सोडविण्याचा सराव जास्त असेल तितकी यशाची शक्यता जास्त असते हे खरेच. पण जेवढया प्रश्नपत्रिका सोडविल्या असतील त्यांचे विश्लेषण करून स्पर्धेत आपण कुठे आहोत आणि अजून किती आणि कोणती तयारी गरजेची आहे याचा वारंवार आढावा आवश्यक आहे.

आयोगाचा साधारणपणे ५६ पानांचा पेपर १२० मिनिटात वाचून सोडवायचा असतो. सलग सोडवत गेले तर ८०व्या प्रश्नापर्यंत पोचणासाठी दिलेला वेळ कधीच पुरणार नाही. म्हणूनच अवघड वाटणारे उतारे आणि प्रश्न बाजूला ठेवून गुण मिळवून देणारे प्रश्न आधी सोडविणे आवश्यक असते. पुरेसा सराव केलेला असेल तर उतारा किंवा प्रश्नाच्या सुरूवातीलाच तो वेळेत सोडविता येईल की नाही हे चटकन लक्षात येते. अवघड प्रश्न / उतारा बाजूला ठेवून मार्क देणाऱ्या प्रश्नाकडे वळता येते.

सी सॅट मध्ये १०० ते १२० गुण मिळवायचे असतील उत्तीर्ण होण्यासाठी २५% निगेटीव्ह मार्कींगचे गुण वजा करता एकूण किमान ४० ते ५० प्रश्नांचे गुण आवश्यक ठरतील. त्यासाठी निगेटीव्ह मार्कींग नसलेले शेवटचे पाच प्रश्न आणि निगेटीव्ह मार्कींग असलेले ५० ते ५५ प्रश्न असे सर्वसाधारणपणे ५५ ते ६० प्रश्न सोडविण्याचे उद्दीष्ट ठरवणे योग्य ठरेल. यापेक्षा काही प्रश्न जास्तीचे सोडवायला हरकत नाही पण त्यासाठी आपले उत्तर बरोबर असल्याची पक्की खात्री असेल तरच.

रूढार्थाने पेपर एकपेक्षा जास्त अवघड, जास्त आव्हानात्मक समजला जाणारा पेपर दोन हा वास्तविक परीक्षा उत्तीर्ण होण्यामध्ये जास्त योगदान देतो. सन २०१३ पासूनच्या राज्यसेवा पूर्व



परीक्षेतील कट ऑफ लाईनचे विश्लेषण केले असता उमेदवारांना प्रत्येकी २०० पैकी पेपर एक मध्ये सर्वसाधारणपणे ६० ते ८५ तर पेपर दोन मध्ये ७० ते १२० पर्यंत गुण मिळाले आहेत हे लक्षात येते. त्यामुळे सी सॅट हा अनावश्यक दडपण न घेता तयारी करायचा विषय आहे हे नेहमी लक्षात ठेवावे. या पेपरमधील घटकांच्या तयारीबाबत पुढील लेखांमध्ये चर्चा करण्यात येत आहे.

यूपीएससीची तयारी

भारताचे संविधान

- प्रवीण चौगले



प्रस्तुत लेखामध्ये आपण भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये याविषयी जाणून घेणार आहोत. सर्वप्रथम आपण मूलभूत हक्कांविषयी चर्चा करूया.

मूलभूत हक्क म्हणजे नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी मूलभूत स्वातंत्र्ये होत. प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी आणि व्यक्तिगत विकासासाठी काही आवश्यक स्वातंत्र्ये राज्याकडून हक्कांच्या स्वरूपात मिळतात. या हक्कांच्या संरक्षणाची हमी जेव्हा राज्याकडून मिळते तेव्हा अर्थपूर्ण जीवन जगणे नागरिकांना शक्य होते. भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे आणि लोकशाही यशस्वी होण्यासाठी मूलभूत हक्कांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा विचार करून मूलभूत हक्कांची हमी नागरिकांना संविधानाद्वारे देण्यात आली आहे. शासनकर्त्यांना घटनादुरुस्तीशिवाय या हक्कांमध्ये बदल अथवा दुरुस्ती करता येत नाही. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागामध्ये कलम १२ ते ३५ नुसार मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. मूळ संविधानामध्ये मूलभूत अधिकारांची संख्या सात होती, मात्र ४४व्या घटनादुरुस्तीनुसार राज्यघटनेतील ह्यसंपत्तीचा हक्कह्ण मूलभूत हक्कांच्या यादीतून वगळण्यात आला. सध्या आपल्या संविधानामध्ये एकूण सहा मूलभूत हक्क आहेत. ते पुढीलप्रमाणे : समतेचा हक्क (कलम १४ ते १८), स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२), शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ ते २४), धार्मिक स्वातंत्र्याविषयीचा हक्क (२५ ते २८), सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ ते ३०) आणि घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम ३२).

भारतीय संविधानामध्ये नमूद काही मूलभूत अधिकार हे सकारात्मक म्हणजे राज्याला सकारात्मक भूमिका देणारे, तर काही हक्क नकारात्मक म्हणजे राज्याला नकारात्मक भूमिका देणारे आहेत. संविधानातील अधिकार सर्व सार्वजनिक अधिसत्तांवर बंधनकारक आहेत. तसेच हे हक्क न्यायप्रविष्ट आहेत. म्हणजेच मूलभूत अधिकारांचे हनन झाल्यास त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येते. यूपीएससी मुख्य परीक्षेच्या दृष्टीने मूलभूत अधिकारांचे अध्ययन करताना प्रथम मूलभूत हक्कांविषयीच्या सविस्तर तरतुदी जाणून घ्याव्यात. मूलभूत अधिकारांच्या संदर्भात झालेल्या घटनादुरुस्त्या किंवा काही नवीन हक्कांचा झालेला समावेश, सर्वोच्च न्यायालयाने समाजात घडणाऱ्या घटनांचे मूलभूत अधिकारांच्या अनुषंगाने दिलेले निवाडे इत्यादी बाबी ज्ञात असणे क्रमप्राप्त आहे.

मूलभूत अधिकारांवर २०१७ साली एक प्रश्न विचारण्यात आला तो पुढीलप्रमाणे:

Examine the scope of Fundamental rights in the light of the latest judgement of the supreme court on right to privacy. (250 words).

हा प्रश्न संविधानातील मूलभूत अधिकारांची पारंपरिक तरतूद आणि समकालीन घडामोडीअंतर्गत सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यांचा मेळ घालून विचारण्यात आलेला आहे. याकरिता नियमितपणे वृत्तपत्रांचे वाचन आणि सर्वोच्च न्यायालयाचे मूलभूत अधिकारांसंबंधीचे निवाडे यांचा मागोवा घेणे श्रेयस्कर ठरते.

शासनकारभार, कायदे निर्मिती, प्रशासकीय धोरणे आणि योजनांची अंमलबजावणी करताना राज्यकर्त्यांना मार्गदर्शन करणारी तत्त्वे म्हणजेच मार्गदर्शक तत्त्वे होय. भारतीय संविधानाच्या चौथ्या भागांमध्ये कलम ३६ ते ५१मध्ये या तत्त्वांचा समावेश आहे. भारतासारख्या सामाजिक व आर्थिक विषमता असलेल्या समाजात राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये समता, न्याय, स्वातंत्र्य प्रस्थापित करणे आवश्यक असते. परिणामी, लोकांची सर्वांगीण प्रगती होण्यास आवश्यक परिस्थिती निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा भारतीय संविधानामध्ये समावेश केला गेला. ही संकल्पना आयर्लंडच्या घटनेतून स्वीकारण्यात आली. या मार्गदर्शक तत्त्वांवर संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी अधिकारांचा जाहीरनामा, गांधीजींचे विचार, समाजवादी विचारसरणी इत्यादींचा प्रभाव दिसतो. मार्गदर्शक तत्त्वे कायदे करताना आणि त्यांची अंमलबजावणी करताना राज्यकर्त्यांनी सदैव समोर ठेवणे घटनाकारांना अपेक्षित आहे. मार्गदर्शक तत्त्वातील सगळ्या हक्कांची हमी देण्याची कुवत शासनाकडे नाही हे वास्तव ओळखून मार्गदर्शक तत्त्वे न्यायप्रविष्ट केली नाहीत. मार्गदर्शक तत्त्वांचे तीन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते -

१. समाजवादी तत्त्वे २. गांधीवादी तत्त्वे आणि ३. उदारमतवादी तत्त्वे.

मार्गदर्शक तत्त्वांवर २०१५च्या मुख्य परीक्षेमध्ये समान नागरी कायद्याच्या पार्श्वभूमीवर प्रश्न विचारण्यात आला होता.

भारतीय नागरिकांमध्ये कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून सरदार स्वर्णसिंह समितीच्या शिफारशीनुसार १९७६ साली ४२व्या घटनादुरुस्तीने राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ५१ (अ) अंतर्गत मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला गेला. समाजाचा एक घटक या नात्याने नागरिकांना हक्क प्राप्त होतात, त्याचप्रमाणे राज्याला नागरिकांकडून कर्तव्य पालनाचीही अपेक्षा असते. लोकशाही राज्यात फक्त हक्कांच्या बाबतीत जागरूक असून चालत नाही, तर प्रत्येक नागरिकाला आपल्या कर्तव्यांची जाणीव असणे महत्त्वाचे ठरते. म्हणून भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत अधिकारांच्या बरोबरीने ११ मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला गेला. मूलभूत कर्तव्यांचे पालन करणे अथवा न करणे हे सर्वस्वी व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून आहे. कारण या कर्तव्यांचे पालन करण्याची सक्ती संविधानाने केलेली नाही. या तरतुदीचा संविधानामध्ये समावेश केल्यामुळे आपल्या देशातील लोकशाही दृढ होण्यासाठी ती फायद्याची ठरली.

हा घटक अभ्यासण्यासाठी 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया' खंड एक (लेखक - तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर) हे संदर्भ पुस्तक वापरावे, तसेच कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया (लेखक - पी. एम. बक्षी) हे पुस्तक आणि वृत्तपत्रांचे नियमित वाचन करावे.

एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

तर्क क्षमता, बौद्धिक क्षमता आणि गणितीय कौशल्ये

राज्यसेवा पूर्वपरीक्षा पेपर दोनमध्ये या घटकावर एकूण ६२.५ गुणांसाठी २५ प्रश्न विचारले जातात. बारकाईने अभ्यास व सराव केल्यास २५ ते ३५ गुण निश्चितपणे मिळवता येतात. या घटकाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे विहीत करण्यात आला आहेः

'तार्किक विचार आणि विश्लेषणात्मक क्षमता, सामान्य बौद्धिक क्षमता, मूलभूत अंकगणितीय कौशल्य व सामग्री विश्लेषणः

या तीन घटकांमधील प्रश्नांचे उपप्रकार आणि वैविध्यामुळे तसेच काही प्रश्न सोडविण्यासाठी लागणारा वेळ पाहता हा घटक काही अंशी आव्हानात्मक वाटतो. पण जास्तीत जास्त व शक्यतो सगळ्याच प्रकारचे प्रश्न सोडविण्याचा सराव करत राहिल्यास या प्रश्नांसाठीची सूत्रे, युक्त्या, प्रयुक्त्या समजतात आणि सरावाने लक्षात ठेवणेही सोपे होते. मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण पाहिले तर या भागामध्ये विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांचे सर्वसाधारण प्रकार पुढीलप्रमाणे आहेतः

- तार्किक विचार आणि विश्लेषणात्मक क्षमता
- बैठक व्यवस्था/ क्रमवारी

एका सरळ रेषेत किंवा वर्तुळाकार बसलेल्या व्यक्तींचा क्रम शोधणे, एखाद्या निकषाच्या आधारे एका गटातील व्यक्ती / वस्तूंची तुलना किंवा क्रम शोधणे.

■ सहसंबंध

दिलेल्या पदांमधील / आकृत्यांमधील सहसंबंध ओळखून पुढील पद शोधणे.

- विधानांवर आधारित निष्कर्षपद्धती (Syllogism)

सर्वसाधारणपणे अवास्तव वाटणारी काही विधाने देऊन त्यांच्या आधारे काढण्यात आलेल्या निष्कर्षांची योग्यायोग्यता तपासायची असते.

तीन वा त्यापेक्षा जास्त व्यक्ती खरे वा खोटे बोलत असल्याचे गृहीतक देऊन त्यांनी सांगितलेल्या माहितीवरुन निष्कर्ष काढणे.

■ नातेसंबंध

दिलेल्या वर्णनावरून गटातील व्यक्तींचे नातेसंबंध प्रस्थापित करून प्रश्नांची उत्तरे द्यायची असतात. मागील काही वर्षांपासून दिलेली माहिती नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी पर्याप्त आहे किंवा कसे अशा प्रकारचे प्रश्नही विचारण्यात आले आहेत.

■ दिशा, घड्याळ व कॅलेंडर

सामान्य बौद्धिक क्षमता

व्यक्तींच्या माहितीचे संयोजन

गटातील व्यक्तींचे छंद/ व्यवसाय/ शिक्षण/ वय, वजन, उंची/ खेळ/ रहिवासाची ठिकाणे यांची कॉम्बिनेशन्स देऊन ठरावीक व्यक्तीशी संबंधित माहिती विचारण्यात येते.

■ सांकेतिक भाषा/ संकेत, अंकाक्षर सांकेतिक भाषा

यावरील प्रश्नांचे दोन ठळक प्रकार पडतात. शब्द किंवा अक्षरांना संकेत देऊन तयार केलेली वाक्ये किंवा पदे देण्यात येतात व त्या नियमांच्या आधारे एखाद्या शब्द / अक्षराचा संकेत शोधणे हा एक प्रकार. तर गटातील अक्षरांना संकेत देऊन त्या खाली दिलेल्या नियमांच्या आधारे तयार होणाऱ्या सांकेतिक पदांवर प्रश्न विचारण्यात येतात. हा प्रकार दुय्यम सेवेमध्ये जास्त विचारण्यात येतो.

■ आकृतिमालिका, आकृत्यांवर आधारित प्रश्न

आकृतीमध्ये समाविष्ट तुकडे किंवा तुकड्यांनी तयार होणारी आकृती; कागदाला घडी घालून छिद्र केल्यास तयार होणारी अंतिम आकृती, पारदर्शक कागदाच्या घडीनंतर दिसणारी आकृती, एका आकृतीवर प्रक्रिया केल्यानंतर मिळणाऱ्या आकृतीबाबतचे नियम समजून घेऊन अशा प्रक्रियांच्या संयोजनावरील प्रश्न, ठरावीक नियमांनी बनलेल्या आकृत्यांच्या मालिकेतील गहाळ किंवा चुकीची आकृती शोधणे.

ठरावीक चिन्हांनंतर आकृतीमध्ये किंवा संख्या / वर्ण यांमध्ये होणारे बदल.

■ वर्णमालिका, अंकाक्षर मालिका

इंग्रजी वर्णमालिकेतील वर्णांच्या संयोजनावरून गाळलेले किंवा चुकीचे पद शोधणे, वर्ण आणि संख्या यांच्या एकत्रित संयोजनामधील पदांचे परस्परसंबंध किंवा संयोजनाचे नियम समजून घेऊन गाळलेले किंवा चुकीचे पद शोधणे.

■ सांकेतिक प्रक्रिया

आकृती किंवा संख्या/अक्षर यांचा समूह यांवर वेगवेगळ्या सांकेतिक चिन्ह / खूणा आल्यावर होणारे बदल/प्रक्रिया समजून घेऊन उत्तर शोधणे.

■ इनपुट आऊट्पुट काऊंटिंग

ठरावीक शब्द किंवा संख्या यांच्या क्रमामध्ये होणाऱ्या बदलांचे नियम समजून घेऊन त्या आधारे दुसऱ्या गटातील शब्द किंवा संख्यांच्या संयोजनावर आधारित प्रश्न.

■ ठोकळे

ठोकळ्यांच्या पृष्ठभागांवरील चिन्हे, आकडे किंवा रंग यांबाबतचे प्रश्न.

मूलभूत अंकगणितीय कौशल्य व सामग्री विश्लेषण

■ संख्यामालिका

यामध्ये एखादी संख्या आधाराशी घेऊन तिच्यावर ठरावीक गणिती सूत्रे किंवा प्रक्रिया वापरून पुढील संख्या काढली जाते आणि त्याच प्रक्रियेने त्यापुढील संख्या. अशा प्रकारे तयार केलेल्या मालिकेतील गहाळ किंवा चुकीची संख्या शोधायची असते. किंवा दिलेल्या संख्या या ठरावीक गणिति प्रक्रियेचे मूल्य असलेल्या असतात. उदा. क्रमाने मूळ संख्यांचे वर्ग अथवा घन अधिक / उणे ठरावीक संख्या.

■ काळ- काम/ अंतर -वेग

मजुरांच्या कामाचे वेग व होणारे काम किंवा गाडी / ट्रेनच्या वेगावरून कापलेले अंतर यावर आधारित प्रश्न असतात. यामध्ये वेगवेगळ्या घटकांच्या वेगाची कॉम्बिनेशन्स वापरून काठिण्य पातळी वाढविण्यात येते.

■ गुणोत्तर व प्रमाण, टक्केवारी व भागीदारी (नफा - तोटा)

मिश्रणांमधील घटकांचे गुणोत्तर किंवा टक्केवारी देऊन त्यावर ठरावीक प्रक्रिया केल्यास तयार होणारे नवीन प्रमाण शोधणे, वेगवेगळ्या वेळी भागीदारी स्वीकारणारे भागीदार व त्यांच्या भांडवलांचे एकमेकांशी असलेले प्रमाण देऊन अंतिम नफा तोटा मोजणे अशा प्रकारचे प्रश्न.

■ त्रिकोणमिती, क्षेत्रमिती

त्रिकोणमिती व क्षेत्रमितीच्या सूत्रांच्या आधारे कमी जास्त होणारे क्षेत्रफळ किंवा त्याच्या देखभाल/ दुरूस्ती/ रंगरंगोटीचा खर्च अशा प्रकारचे उपयोजित प्रश्न. तसेच त्रिकोणमितीच्या आधारे दिशाज्ञानाचे प्रश्न.

■ आकृतीमधील गणिती प्रक्रिया

एकाच आकृतीमध्ये समाविष्ट संख्यांमधील संबंध समजून घेऊन गहाळ संख्या शोधणे; एका आकृतीमधील संख्यांचा संबंध समजून घेऊन दुसऱ्या आकृतिमधील संख्या शोधणे;

■ डेटा इंटरप्रिटेशन

स्तंभ, रेषा यांचे आलेख किंवा पाय चार्ट, वेन आकृत्या यांमध्ये दिलेल्या आकडेवारी किंवा टक्केवारीवर आधारीत प्रश्न. मागील काही वर्षांमध्ये हे प्रश्न विचारलेले दिसून येत नसले तरी अजूनही अभ्यासक्रमामध्ये या घटकाचा उल्लेख असल्याने त्याची तयारी करणे व्यवहार्य ठरते.

■ डेटा सफिशिएन्सी

दिलेल्या माहितीमधील कोणती माहिती एखादे विधान सिद्ध करण्यास आवश्यक किंवा पुरेशी आहे हे शोधणे; दिलेल्या संकेतांच्या आधारे माहितीवर प्रक्रिया करून उत्तर शोधणे अशा प्रकारचे प्रश्न.

अभ्यासक्रमात तीन उपघटकांचा स्वतंत्रपणे उल्लेख असला तरी बऱ्याच प्रश्नांमध्ये यांचा एकत्रित वापर केलेला असतो. त्यामुळे वर उल्लेख केलेल्या प्रकारांची कॉम्बिनेशन्ससुद्धा विचारली जातात. त्यामुळे या मूलभूत प्रकारांचा सराव झाला की, गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्याचाही आत्मविश्वास येतो.

यूपीएससीची तयारी

- प्रवीण चौगले

भारताचे संविधान

आजच्या लेखामध्ये आपण घटना दुरुस्ती प्रक्रिया, मूलभूत संरचना आणि आणीबाणीविषयक तरतूद या बाबी जाणून घेणार आहोत. सर्वप्रथम आपण भारतीय संविधानातील कलम ३६८मध्ये समाविष्ट घटना दुरुस्ती प्रक्रियेसंबंधी चर्चा करू. संविधान कोणत्याही प्रकारचे असले तरी त्याच्या निर्मितीला विशिष्ट काळाचा संदर्भ असतो. त्या काळातील देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक इत्यादी परिस्थिती विचारात घेतली जाते. याशिवाय भविष्यातील संभाव्य समस्या, बदलणारी परिस्थिती यांचा अंदाज घेऊन काही तरतुदी राज्यघटनेत समाविष्ट केल्या जातात. परिणामी, संविधानामध्ये बदललेल्या परिस्थितीशी सुसंगत ठरणाऱ्या सुधारणा करणे उचित ठरते. भारतीय संविधानाच्या भाग २० मधील ३६८व्या कलमात घटना दुरुस्तीची पद्धती सांगितलेली आहे. यामध्ये दुरुस्तीचे उद्देश काय असावेत, घटना दुरुस्तीचे अधिकार कोणाला आहेत, घटना दुरुस्ती करताना कोणत्या पद्धतीचा अवलंब करावा इत्यादी बाबींचा समावेश आहे. घटना दुरुस्तीमध्ये औपचारिक आणि अनौपचारिक प्रक्रियेचा अवलंब केला जातो.

भारतीय घटना १) संसदेच्या साध्या बहुमताने २) संसदेच्या विशेष बहुमताने आणि ३) संसदेचे विशेष बहुमत व घटकराज्ये यांच्या अनुमतीने बदलली जाऊ शकते. घटना दुरुस्तीच्या अनौपचारिक पद्धतीमध्ये १) न्यायालयीन अन्वयार्थ आणि २) संकेत, रूढी आणि व्यवहार यांचा समावेश होतो. या माध्यमातूनही घटनात्मक तरतुदीमध्ये बदल घडवून आणता येतो.

घटना दुरुस्ती प्रक्रियेचे अवलोकन केले असता भारतीय राज्यघटनेने लवचिकता व परिदृढता यांचा सुवर्णमध्य साधलेला आहे. या घटकाची तयारी करताना घटना दुरुस्ती प्रक्रिया, आतापर्यंत झालेल्या सर्व महत्त्वाच्या घटना दुरुस्त्या, संसदेचा घटना दुरुस्तीचा अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाची भूमिका व त्यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निवाडे यांची माहिती असणे आवश्यक आहे. २०१७च्या मुख्य परीक्षेमध्ये १०१व्या घटना दुरुस्तीशी संबंधित, वस्तू व सेवा कराच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आला.

Q. Explain the salient features of the constitution (one hundred and First amendment) Act, 2016. Do you think it is efficacious enough to remove cascading effect of taxes and provide for common national market for goods and services. (50 words).

भारतीय राज्यघटनेमध्ये घटना दुरुस्तीचा अधिकार संसदेला बहाल केलेला आहे. मात्र या अधिकाराचा वापर किती व कोणत्या संदर्भात करावा यावरून संसद व सर्वोच्च न्यायालय यांच्यामध्ये मतभिन्नता आहे. १९७३मध्ये केशवानंद भारती खटल्यामध्ये संविधानाच्या मूलभूत संरचनेमध्ये बदल करता येणार नाही असा निर्णय दिला. जरी राज्यघटनेमध्ये मूलभूत संरचना कुठेही परिभाषित केलेली नसली तरी सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी मूलभूत संरचनेची चौकट ठरविण्याचा प्रयत्न केला. संविधानाची सर्वोच्चता, कायद्याचे राज्य, देशाचे सार्वभौमत्व, एकात्मता, धर्मनिरपेक्षता, संघराज्यात्मक स्वरूप, प्रजासत्ताक, लोकशाहीप्रधान शासन व्यवस्था, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, सत्ताविभाजन, मार्गदर्शक तत्त्वे इत्यादी बाबींचा मूलभूत संरचनेत समावेश केला. पुढे न्यायमूर्ती जगमोहन रेड्डी यांनी संविधानातील उद्देशपत्रिका हीसुद्धा घटनेची मूलभूत संरचना आहे असे स्पष्ट केले. राज्यघटनेचा गाभा आणि तत्त्वज्ञान टिकवून ठेवण्यासाठी हा सिद्धांत आणला गेला. या सिद्धांताचे उल्लंघन करणारा कोणताही कायदा सर्वोच्च न्यायालयाद्वारे रद्द घोषित केला जातो. २०१९ साली मुख्य परीक्षेमध्ये या तरतुदीशी संबंधित प्रश्न विचारण्यात आला.

Q. ''Parliaments power to amend the constitution is a limited power and it cannot be enlarged into absolute power.'' In the light of this statement explain whether parliament under article 368 of the constitution candestroy the basic structure of the constitution by expanding its amending power. (250 words).

भारतीय संविधानातील भाग १८ मध्ये कलम ३५२ ते ३६०कलमान्वये आणीबाणीविषयक तरतुदींचा समावेश केला आहे. या तरतुदीमुळे निकडीची परिस्थिती, युद्ध, बाह्य आक्रमण, अंतर्गत अशांतता, आर्थिक संकट इत्यादी अनियमित अथवा आणीबाणी सदृश्य परिस्थिती हाताळण्याकरिता केंद्र सरकारला सक्षम बनवले आहे. देशाचे सार्वभौमत्व, एकता, अखंडता आणि सुरक्षा तसेच लोकशाही स्वरूपाची राजकीय व्यवस्था आणि राज्यघटना इत्यादी बाबींचे संरक्षण करता यावे याकरिता भारतीय राज्यघटनेमध्ये आणीबाणीविषयक तरतुदींचा समावेश केला गेला. भारतीय संविधानामध्ये तीन प्रकारच्या आणीबाणीचा उल्लेख आढळतो. १) राष्ट्रीय आणीबाणी (कलम ३५२) २) राष्ट्रपती राजवट (कलम ३५६) आणि ३) वित्तीय आणीबाणी (कलम ३६०). आणीबाणीच्या काळामध्ये सर्व सत्ता केंद्र सरकारच्या हाती एकवटते आणि राज्यांवर केंद्राचे संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित होते. राज्यघटनेमध्ये कोणतीही दुरुस्ती न करतादेखील यामुळे संघराज्य स्वरूपाचे रूपांतर एकात्म व्यवस्थेमध्ये होते. या घटकाची तयारी करताना आणीबाणीविषयक तरतुदी, आणीबाणीचे परिणाम, मूलभूत हक्कांवर होणारे परिणाम इत्यादी बाबी जाणून घ्याव्यात. तसेच, राज्य आणीबाणीविषयक तरतुदी अभ्यासाव्यात कारण आजवर कलम ३५६ चा बऱ्याचदा गैरवापर झालेला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती राजवटीबाबतचे न्यायालयाचे निवाडे अभ्यासावेत. यानंतर वित्तीय आणीबाणी संबंधित तरतुदी जाणून घ्याव्यात. वित्तीय आणीबाणी कोणत्या परिस्थितीमध्ये घोषित केली जाते ती परिस्थिती तसेच वित्तीय आणीबाणीचे परिणाम माहीत करून घेणे आवश्यक ठरते. वित्तीय आणीबाणीसंबंधित एक प्रश्न २०१९मध्ये विचारण्यात आला.

Under what circumstances can the financial emergency be proclaimed by the president of India? What consequences follow when such a declaration remains in force? (150 words).

उपरोक्त घटकांचे अध्ययन 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया' खंड १, इंडियन पोलिटी, या संदर्भ ग्रंथांमधून करावे. तसेच, वृत्तपत्रांचे नियमित वाचन आपल्याला या तरतुदींशीसंबंधित समकालीन घडामोडींचा आढावा घेण्यासाठी उपयुक्त ठरेल. याकरिता 'इंडियन एक्सप्रेस' सारख्या वृत्तपत्रांचे वाचन करावे.

एमपीएससी मंत्र

फारुक नाईकवाडे

सामान्य बौद्धिक क्षमता





राज्यसेवा पूर्व परीक्षेमध्ये बुद्धिमत्ता चाचणी घटकामध्ये अंतर्भूत तर्कक्षमता, बौद्धिक क्षमता आणि गणितीय कौशल्ये या तीन घटकांवर यापूर्वी विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे प्रकार व त्यांचे स्वरूप यावर मागील लेखामध्ये चर्चा केली. या लेखामध्ये त्यांच्या तयारी व सरावाबाबत चर्चा करण्यात येत आहे.

तर्कक्षमतेमध्ये विधानांवर आधारित निष्कर्ष पद्धती, नातेसंबंध, बैठक व्यवस्था हे मुद्दे समाविष्ट होतात. प्रथमदर्शनी क्लिष्ट वाटणाऱ्या या प्रश्नांचा सराव केल्यास आणि त्यांच्यामागचे नेमके तर्क समजून घेतल्यास हे प्रश्न वेळेच्या मर्यादेत सोडविणे शक्य होते.

निष्कर्ष पद्धतीमध्ये दिलेली विधाने खरी मानून ती वेन आकृत्यांमध्ये मांडून प्रश्न सोडवावेत.

तीन वा त्यापेक्षा जास्त व्यक्ती खरे वा खोटे बोलत असल्याचे गृहीतक देऊन त्यांनी सांगितलेल्या माहितीवरून निष्कर्ष काढणे अशा प्रश्नांमध्ये एलिमिनेशन पद्धतीने किंवा दिलेल्या पर्यायांचाच विचार करून उत्तर शोधले तर वेळेची बचत होते.

सहसंबंधांच्या प्रश्नांमध्ये संख्यामालिका, अंकअक्षर मालिका किंवा आकृती मालिका यांचे प्रश्न सोडविण्यासाठी वापरायच्या युक्त्या उपयुक्त ठरतात.

नातेसंबंधांवरील प्रश्नांसाठी त्यातील एका पात्राच्या जागी स्वतःस कल्पून ते प्रश्न सोडवावेत. मागील काही वर्षांपासून दिलेली माहिती नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी पर्याप्त आहे किंवा कसे, अशा प्रकारचे प्रश्नही विचारण्यात आले आहेत. त्यामुळे डेटा सफिशिएन्सी आणि नातेसंबंध यांची सांगड घालता येणे आवश्यक आहे.

सरळ रेषेतील बैठकी/ रांगेचे प्रश्न तुलनेने सोपे वाटतात. गोलाकार बैठक व्यवस्थेचे प्रश्न सोडविताना एकमेकांसमोरील व्यक्ती व त्यांच्या डाव्या उजव्या बाजू कटाक्षाने लक्षात घ्यायला हव्यात.

एका गटातील व्यक्तींच्या वजन, उंची, गुण, त्यांच्या टोपी/ कपड्यांचे रंग अशा एकाच निकषाच्या आधारे त्यांचा क्रम शोधण्यासाठी दिलेल्या वाक्यांतील माहितीची एका रेषेवर मांडणी करता येईल. व्यक्ती वस्तूंची दिलेली तुलना वापरून निष्कर्ष काढण्यासाठीही अशाच प्रकारे रेषेवर माहिती मांडता येईल.

घड्याळातील काट्यांचे कोन, आरशातील प्रतिमा, कॅलेंडरमधील लीप इयरचा विचार या बाबी सरावाने सोप्या होतील.

दिशांबाबतच्या प्रश्नांमध्ये सरळ सांगितलेल्या मार्गाचे आरेखन करत गेल्यास योग्य उत्तर लवकर सापडते.

एका गटातील व्यक्तींच्या छंद, रहिवास, व्यवसाय, आवडीचे खेळ, वजन, उंची, गुण अशा एकापेक्षा जास्त निकषांच्या आधारे त्यांमधील प्रत्येकाशी संबंधित माहितीवर प्रश्न विचारले जातात. माहितीच्या संयोजनावरील असे प्रश्न सोडविताना कोष्टकामध्ये माहिती भरत गेल्यास अचूक उत्तर व कॉम्बिनेशन्स सापडतात.

आकृती मालिकांवरील प्रश्न सोडविताना निरीक्षणशक्ती आणि विश्लेषण क्षमता यांचा वापर आवश्यक ठरतो. यामध्ये घड्याळाच्या काट्याच्या किंवा उलट्या दिशेने ठरावीक कोनांतून बदलणारे स्थान किंवा दोन आकृत्यांमधील ठरावीक स्थांनावरील घटकांची बेरीज वा वजाबाकी अशा प्रक्रियांच्या आधारे उत्तरे शोधता येतात.

दिलेल्या प्रश्नातील ठरावीक चिन्हांनंतर आकृतीमध्ये किंवा संख्या/ वर्ण यांमध्ये होणारे बदल नीट निरीक्षणातून लक्षात येतात. त्यातून प्रश्नातील चिन्हांची प्रक्रिया करुन उत्तरे शोधता येतील.

अक्षरमालिका आणि अंकाक्षर मालिका सोडविण्यासाठी इंग्रजी वर्णमाला एकाखाली एक सरळ आणि उलट्या क्रमाने लिहावी आणि त्यांना त्याच क्रमाने आकडे द्यावेत. या आधारे अक्षरमालिका, अंकाक्षर मालिका आणि आकृतीमधील अक्षरांचे प्रश्न सोडवावेत.

सांकेतिक भाषेवरील प्रश्नांसाठी एलिमिनेशन पद्धतीने शब्द व त्यांचे संकेत शोधावेत.

इनपुट आऊटपुट प्रश्नांसाठी दिलेल्या शब्द/ संख्यांना क्रमांक देऊन त्यांचे क्रम कशा प्रकारे बदलत जातात त्यांचे नियम शोधावेत.

सर्वसाधारणपणे या उपघटकामध्ये गणिती क्रियांवर ६ ते ८ प्रश्न आणि संख्यामालिकेवर २ ते ५ प्रश्न विचारण्यात येतात.

पायाभूत गणिती सूत्रे तसेच परिमिती, क्षेत्रफळ आणि घनफळ यांबाबतची सूत्रे आणि १ ते ३० पर्यंत पाढे पाठ असतील तर ही गणिते कमी वेळेत आणि आत्मविश्वासाने सोडविता येतात.

संख्यामालिका, आकृतीमधील गणिती क्रिया सोडविण्यासाठी १ ते ३० पर्यंतचे पाढे, १ ते २० पर्यंतचे वर्ग आणि १ ते १५ पर्यंतचे घन पाठ असतील तर हे प्रश्न सोडविण्यातही आत्मविश्वास मिळवता येतो. या मूलभूत गोष्टींबरोबर अंकाक्षर मालिकाही विचारण्यात येत आहेत.

शेकडेवारी, व्याज, नफातोटा, भागीदारी, गुणोत्तर प्रमाण, समीकरणे, काळ काम वेग अंतर, माहिती विश्लेषण आणि संभाव्यता हे घटक विशेष महत्त्वाचे आहेत. यामध्ये पहिले पाच घटक एकत्रितपणे अभ्यासावेत.

नफ्याचे गुणोत्तर किंवा टक्केवारी, व्याजातील फरकाचे प्रमाण अशा प्रकारे यांच्या एकत्रित उपयोजनाचे प्रश्न विचारण्यावर आयोगाचा भर दिसतो. सूत्रे पाठ असावीतच पण हे घटक सोडविताना का आणि कसे हे नेमकेपणाने समजून घेऊन सराव केल्यास कशाही प्रकारे प्रश्न विचारला तरी नेमकी कोणती प्रक्रिया करायला हवी हे लक्षात येते.

डेटा इंटरप्रिटेशनच्या प्रश्नांमध्ये एकापेक्षा जास्त प्रश्न विचारले असल्यास सर्व प्रश्न पाहून मगच माहितीवर प्रक्रिया करावी. जर एकच प्रश्न विचारला असेल तर तो वाचून मग त्यासाठी आवश्यक असेल तेवढीच प्रक्रिया दिलेल्या आलेख/ आकृतीमधील माहितीवर करावी. त्यातून वेळेची बचत होऊ शकते.

डेटा सफिशिएन्सीच्या प्रश्नांमध्ये दिलेली गाणिती प्रक्रिया करून कोणते विधान आवश्यक आहे ते ठरविता येते. नातेसंबंधांवरील माहितीच्या प्रश्नांमध्येही तर्कक्षमतेच्या प्रश्नांमध्ये डेटा सफिशिएन्सीचे उपयोजन करण्यासारखे प्रश्नही विचारण्यात येत आहेत.

या घटकामध्ये किमान ५० ते ६० टक्के प्रश्न सोडविणारे उमेदवार चांगले गुण मिळवून उत्तीर्ण होतात. त्यामुळे यातील जास्तीत जास्त प्रकारचे प्रश्न सोडविण्याचा सातत्याने सराव करत राहायला हवा. खरे तर सराव हीच या घटकाची तयारी आहे हे लक्षात घ्यायला हवे. सरावातून या प्रश्नांसाठीच्या युक्त्या आणि प्रयुक्त्या समजतात. प्रश्न पाहिल्यावर त्यासाठीची क्लृप्ती पटकन आठवते. त्यामुळे ऐन वेळी प्रश्न सोडविताना वेळ वाचतो. या घटकामध्ये २५ पेक्षा जास्त गुण मिळवायचे असतील तर सराव हा एकच पर्याय आहे!

राज्यव्यवस्था आणि राजकीय प्रक्रिया

यूपीएससीची तयारी

- प्रवीण चौगले

आजच्या लेखामध्ये आपण सामान्य अध्ययन पेपर 2 मधील राज्यव्यवस्था व राजकीय प्रक्रियाविषयक घटकांसंबंधी चर्चा करणार आहोत. त्यामध्ये भारतीय संघराज्य, संघराज्य रचनेशी संबंधित मुद्दे, केंद्र व राज्य यामधील सत्ता विभाजन, राज्य व केंद्र सरकारचे अधिकार आणि कार्य इ. बाबी अभ्यासणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम आपण भारतातल्या संघराज्य पद्धतीविषयी जाणून घेऊ. भारतीय संघराज्य इतर देशातील संघराज्यापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामान्यतः राज्यव्यवस्थांचे दोन प्रकार पडतात, संघराज्यात्मक व्यवस्था आणि एककेंद्रीय व्यवस्था यापैकी संघराज्य पद्धती अमेरिका या



देशात प्रचलित आहे तर इंग्लंडमध्ये एककेंद्री व्यवस्था आहे. याउलट भारतीय संघराज्याला केंद्राकर्षी संघराज्य असे म्हणतात. कारण भारतीय राज्याची चौकट संघराज्य स्वरूपाची आहे तर भारतीय राज्याचा आत्मा एक केंद्रीय (Unitary) आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय संघराज्याच्या स्वरूपाविषयी कित्येक घटनातज्ज्ञांनी मते व्यक्त केली आहेत. उदाहरणार्थ के.सी. व्हीअर यांच्या मते भारतीय संघराज्य अर्धसंघराज्य (quasi federal) आहे. अशाच प्रकारची इतर मते व त्यांचा अर्थ जाणून घ्यावा. भारताचे भौगोलिक स्वरूप व लोकसंख्या इत्यादी बाबी ध्यानात घेऊन राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने संघराज्य व्यवस्था योग्य ठरली असती. तथापि, भारतात विविध भाषा धर्म व प्रादेशिक विविधता आहे आणि या विविधतेमुळे विघटनात्मक प्रवृत्ती निर्माण होऊ नये, देशाचे ऐक्य टिकून रहावे यासाठी केंद्र सरकार मजबूत असणे आवश्यक होते म्हणून भारतीय घटनाकारांनी देशात केंद्राकर्षी स्वरूपाच्या संघराज्याची निर्मिती केली. या घटकाचे अध्ययन करताना संघराज्याची वैशिष्ट्ये जाणून घ्यावीत. याबरोबरच या घटकाशी संबंधित समकालीन बाबी जसे सहकारी संघवाद, वित्तीय संबंध, आणीबाणीविषयक तरतुदी, राज्यपालांची भूमिका, संघराज्यांसमोरील आव्हाने यांची माहिती घ्यावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सातव्या अनुसूचीचे मूलभूत आकलन करून घ्यावे. अखिल भारतीय सेवा, पाणीविषयक विवाद, वस्तू व सेवा कर आदी केंद्र व राज्यांमध्ये असणारे विवादास्पद मुद्दे अभ्यासणे आवश्यक ठरते. भारतातील संघराज्य रचनेच्या पार्श्वभूमीवर आणि सीबीआयचे अधिकार क्षेत्र यांच्या पार्श्वभूमीवर २०२१मध्ये एक प्रश्न विचारला गेला तो पुढीलप्रमाणे,

Q. The jurisdiction of the Central Bureau of Investigation (CBI) regarding lodging an FIR and conducting probe within a particular state is being questioned by various states. However, the power of states to withhold consent to the CBI is not absolute. Explain with special reference to the federal character of India. (250 words) 15 marks.

अलीकडे सहकारी संघवाद ही संकल्पना नेहमीच चर्चेत असते. या संकल्पनेला बळ देण्यासाठी केंद्र सरकारने काही पावले उचललेली दिसतात. यामध्ये केंद्र व घटक राज्य यांच्या संबंधांमध्ये नेहमीच वादग्रस्त ठरलेल्या योजना आयोगास बरखास्त केले गेले व त्या जागी नीति आयोगाची स्थापना करण्यात आली. तथापि, प्रचलित व्यवस्थेतील काही दोषांचे निराकरण करण्यासाठी आणखीन काही बाबींवर ठोस उपाय योजना करणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ, परराष्ट्र धोरणासंबंधीच्या निर्णयांमध्ये राज्यांशी सल्लामसलत हवी, तसेच राज्यपालाची भूमिका, राष्ट्रपती राजवट, अखिल भारतीय सेवा किंवा केंद्रीय संस्थांचे अधिकारक्षेत्र इत्यादी. सहकारी संघवाद या संकल्पनेवर मुख्य परीक्षेमध्ये प्रश्नही विचारण्यात आलेला आहे.

सत्ता विभाजनाच्या तत्त्वांमध्ये सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी शासनाने विविध अधिकार किंवा कार्य यांचे विभाजन करून भिन्न व्यक्तींकडे ती सोपवली जावी असे अभिप्रेत आहे. भारतासारख्या देशामध्ये या तत्त्वाची नितांत आवश्यकता आहे. भारतात राज्यव्यवस्थेच्या तिन्ही अंगांमध्ये असणारे सत्ता विभाजनाचे तत्व कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यामध्ये घनिष्ठ संबंध असल्याने परिपूर्ण नाही. मात्र न्यायमंडळ स्वायत्त आहे. राज्यघटनेतील सत्ता विभाजनाशी संबंधित कलमे ३६१, ५०, २११ मधील तरतुदी अभ्यासाव्यात.

देशातील विविध घटकराज्यांमध्ये पाणी वाटप हा मुद्दा नेहमीच विवादास्पद राहिला आहे. संसदेने याबाबत आंतरराज्य जलविवाद अधिनियम १९५६ हा कायदा जलविषयक विविध वादांचे निराकरण व रिव्हर बोर्ड या संदर्भामध्ये केला आहे. या कायद्यान्वये जलविषयक विवादांचे निराकरण करण्यासाठी न्यायाधिकरणाची तरतुद आहे. ती तदर्थ स्वरूपाची आहे. तसेच त्यांची स्थापना संबंधित राज्यांच्या विनंतीवरून केंद्र सरकारच्या अखत्यारीत होते. जलवाटप हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. कारण जलवाटप किंवा सीमा प्रश्न संघराज्यासमोरील आव्हाने आहेत. तसेच परीक्षेमध्येही यावर प्रश्न विचारण्यात आला आहे. म्हणूनच राज्यघटनेतील या विषयीची तरतुदी, संसदेने पारित केलेले कायदे, केंद्र सरकारने वेळोवेळी नेमलेली न्यायाधिकरणे यांविषयी जाणून घेणे श्रेयस्कर ठरते. या जलवाटपाच्या बाबींमध्ये आपल्याला कावेरी, गोदावरी, नर्मदा, महादयी, कृष्णा इत्यादी पाणीवाटप विवादांची उदाहरणे देता येतील. या घटकावर आजवर विचारण्यात आलेले प्रश्न हे विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहेत. तसेच प्रत्येक प्रश्नास समकालीन घडामोडींची पार्श्वभूमी आहे. घटकाचे मूलभूत आकलन करून यासाठी इंडियन पोलिटी एम. लक्ष्मीकांत, भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया हा तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर लिखित संदर्भ ग्रंथ, 'द हिंदू'ह्न किंवा ह्यइंडियन एक्सप्रेसह्न यांसारखी वृत्तपत्रे नियमितपणे वाचावीत. तसेच या घटकाशी संबंधित समकालीन घडामोडींचे सखोल अध्ययन करण्यासाठी ईपीडब्ल्यू, योजना यांसारखी नियतकालिके व पीआरएस लेजिस्लेचर या संकेतस्थळाचा फायदा होईल.

एमपीएससी मंत्र

उताऱ्यांवर आधारित प्रश्न

फारुक नाईकवाडे

आकलन कौशल्यांची चाचणी :

हा घटक पूर्व आणि मुख्य परीक्षा या दोन्ही टप्प्यांवर समाविष्ट करण्यात आलेला आहे. हा भाग समाविष्ट करण्यामागे आयोगाचा हेतू समजून घ्यायला हवा. उमेदवारांच्या आकलन क्षमता आणि भाषिक आकलनाची चाचणी या घटकाच्या माध्यमातून घेण्यात येते. पूर्व परीक्षेमध्ये सर्वाधिक (५० टक्के) गुणांसाठी विचारला जाणारा हा घटक सर्वाधिक लांबीचा आणि वेळखाऊसुद्धा असतो. त्यामुळे याची तयारी आणि परीक्षा हॉलमधील वेळेचे नियोजन या बाबी अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे.

या घटकाचे सर्वसाधारण स्वरूप पुढीलप्रमाणे आहे –

- अभ्यासक्रमातील आकलन आणि इंग्रजी व मराठी भाषा आकलन या दोन स्वतंत्र मुद्यांसाठी उताऱ्यांवरील प्रश्न विचारण्यात येतात.
- एकूण १० पैकी आठ उतारे हे मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये देण्यात येतात.
- एक उतारा फक्त मराठीमध्ये आणि एक उतारा फक्त इंग्रजीमध्ये त्या त्या भाषांच्या आकलनाची चाचणी करण्यासाठी समाविष्ट करण्यात येतो.
- हे उतारे सरासरी ३०० ते ३५० शब्दांचे असतात.
- एकूण ५० पैकी किमान १० प्रश्न हे बहुविधानी प्रकारचे असतात.

मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका आणि उमेदवारांच्या अनुभवाचे विश्लेषण केले तर या विषयाच्या तयारीमध्ये पुढील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

दिलेला उतारा उमेदवार पहिल्यांदाच वाचत आहे हे प्रश्नकर्त्याला माहीत असते त्यामुळे विनाकारण गुंतागुंतीचे प्रश्न विचारले जात नाहीत.

परीक्षा हॉलमध्ये आपल्याला उताऱ्याचा अभ्यास करायचा नाही तर प्रश्नांची उत्तरे देऊन गुण मिळवायचे आहेत हे मनामध्ये व्यवस्थित बिंबवून घ्यायला हवे. आपल्याला प्रश्नांचे उत्तर व्यवस्थित सापडत असेल तर उतारा संपूर्णपणे कळला नसेल तरी हरकत नसते. अर्थात प्रश्न



वाचून त्यांची उत्तरे शोधली आणि काम झाले असा कोणताही उतारा सहज सोपा नसतो. तो ढोबळमानाने तरी समजलाच पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे उतारे वाचणे आणि सोडवण्याचा सराव अत्यंत आवश्यक आहे.

आकलनाच्या हेतूने वाचन करण्यासाठी लागणारा वेळ हा मनोरंजनासाठी किंवा निर्हेतूक वाचनाच्या जवळपास दुप्पट असतो. त्यामुळे उतारा समजून घेऊन प्रश्न सोडविताना वेळेच्या मर्यादेमुळे ताण येतोच. परिणामी एकाग्रतेने आणि वेगाने उतारा वाचणे आव्हानात्मक वाटते. वेळेचे नियोजन आणि मार्कांचे गणित कोलमडण्याची शक्यता वाढते. त्यामुळे वेळ लावून सराव करणे या घटकाच्या तयारीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

बहुतांश वेळा मराठीतूनच उतारा वाचण्याचा उमेदवारांचा कल असतो. पण बऱ्याच वेळा यामुळे पर्यावरणविषयक किंवा काही विज्ञानविषयक माहितीवरील उतारे वाचून समजण्यास जास्त वेळ लागतो. अवघड पारिभाषिक शब्दांमुळे उमेदवारांना उता-याचे आकलन होण्यात अडचणी येतात. अशा उता-यांमध्ये जर पारिभाषिक संज्ञा जास्त असतील आणि तथ्यात्मक प्रश्न जास्त विचारले असतील तर असे उतारे इंग्रजीतून वाचल्यास वेळेची बचत होऊ शकते.

तथ्यात्मक माहिती, पारिभाषिक संज्ञांचा समावेश असलेल्या उताऱ्यांवर सरळ प्रश्न विचारण्याचे प्रमाण जास्त आहे हे मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांच्या विश्लेषणातून लक्षात येते. असे उतारे आधी प्रश्न पाहून वाचत गेल्यास शक्य तेथे प्रश्नानुसार आवश्यक माहिती अधोरेखित करत वाचणे शक्य होते आणि उत्तरे देण्याचा वेळ कमी होतो.



एखाद्या उताऱ्याचा टोन औपरोधिक किंवा तिरकस असेल तर भाषेवर आवश्यक पकड नसलेल्या उमेदवारांसाठी तो समजून घेणे आव्हानात्मक ठरू शकते. अवांतर साहित्यिक वाचनाची सवय (अभ्यासावर परिणाम होऊ न देता) असेल तर असे उतारेही आत्मविश्वासाने सोडविता येतात.

काही वेळा उताऱ्याच्या पहिल्या काही ओळी वाचून तो अवघड वाटल्याने आत्मविश्वास कमी होतो आणि त्यामुळे त्यावरील प्रश्न फारसे आव्हानात्मक नसले तरी अवघड वाटू लागतात. एखादा उतारा नाही समजला आणि त्यावर तथ्यात्मक माहिती विचारली असेल तर तो बोनस घ्यायलाच हवा.

प्रश्नपत्रिकांच्या विश्लेषणावरून दिसते की, संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक प्रश्न हे प्रबोधन काळ, लेखकांचे व्यक्तिगत अनुभव, ॲबस्ट्रॅक्ट विषयांवर आधारित उताऱ्यांवर विचारण्यात येतात. त्यामुळे अशा विषयांवरील लोकसत्ता, साधना मासिक अशा स्त्रोतांतील लेख वाचणे आणि तयारीच्या वेळी ते व्यवस्थित समजून घ्यायचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

असे लेखन समजून घ्यायचा सराव झाला की परीक्षा हॉलमध्ये कमीत कमी वेळेमध्ये उता-यांचे आवश्यक आकलन होण्यास मदत होते.

मराठी आकलनासाठी तिरकस, औपरोधिक आणि तत्त्वचिंतनपर अशा विषयांवरील साहित्य वाचण्याचा सराव आवश्यक आहे.

इंग्रजी आकलनासाठी इंडियन एक्सप्रेसमधील संपादकीय, विज्ञान व अर्थव्यवस्थेबाबतचे लेख वाचून ते समजून घेण्याचा सराव आवश्यक आहे. त्याचबरोबर शब्द संग्रह वाढविण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करायला हवा. याचा फायदा नेहमीसाठी होणार आहे.

आकलनाच्या पारंपरिक प्रश्न पद्धतीमध्ये प्रश्नांची स्वतःच्या भाषेत उत्तरे लिहून आपले कौशल्य दाखविण्यास वाव असतो. पण वस्तुनिष्ठ प्रकारामध्ये दिलेल्या पर्यायांमधून उत्तरे शोधताना नेमकेपणा आणि प्रश्नकर्त्याला अपेक्षित उत्तराचा अंदाज बांधणे या बाबी महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे वाचन आणि त्यातून नेमके आकलन याचा सराव या घटकामध्ये जास्तीत जास्त गुण मिळवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

दिलेला उतारा उमेदवारांनी कमीत कमी वेळेत समजून घेऊन त्यावरील प्रश्नांची उत्तरे देणे यामध्ये अपेक्षित आहे. एका अर्थाने हा उमेदवारांच्या वाचन आणि आकलनाची परीक्षा असतो. आकलनाशिवाय वेगाने वाचन सोपे आहे मात्र आकलन करत वाचणे हा वेळ खाणारा प्रकार आहे. आकलनासहित वाचनाचा वेग वाढवण्यासाठी सराव खूप आवश्यक आहे.

यूपीएससीची तयारी

- प्रवीण चौगले

घटनात्मक, बिगर घटनात्मक संस्था आणि आयोग

प्रस्तुत लेखामध्ये आपण घटनात्मक व बिगर घटनात्मक संस्था आणि आयोग यांच्याविषयी चर्चा करणार आहोत. राज्यघटनेमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या मुख्य संस्थांशिवाय इतर काही संस्था वा यंत्रणा यांची तरतूद आढळते. त्यांना घटनात्मक आयोग, संस्था असे म्हटले जाते. याशिवाय राज्य घटनेच्या आगामी वाटचालीत काळानुरूप काही इतर संस्था, आयोग स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. या अनुषंगाने संसद वा कार्यकारी मंडळ यांनी स्थापन केलेल्या संस्था, आयोग यांचा उल्लेख बिगर घटनात्मक आयोग असा करण्यात आलेला आहे. घटनात्मक आयोगामध्ये महालेखापाल, महाधिवक्ता, निवडणूक आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, एससी/एसटी आयोग, वित्त आयोग तर बिगर घटनात्मक आयोगांमध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, दक्षता आयोग, माहिती आयोग, आयआरडीए, हरित न्यायाधिकरण, महिला आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, स्पर्धा आयोग इत्यादींचा समावेश आहे. यातील काही आयोग, संस्था यांची यूपीएससीमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने माहिती घेऊयात.

वित्त आयोग : संघराज्य पद्धतीमध्ये घटक राज्यात वित्तीय समतोल राखण्यासाठी काही व्यवस्था करावी लागते. भारतात अशी व्यवस्था संविधानाच्या कलम २८० नुसार वित्त आयोगाच्या रूपाने करण्यात आली आहे. सामान्यतः दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमला जावा अशी तरतूद आहे. तथापि राष्ट्रपतींना आवश्यक वाटल्यास पाच वर्षांच्या कालावधी पूर्वीही नवीन वित्त आयोग निर्माण केला जाऊ शकतो. २०२१ च्या मुख्य परीक्षेमध्ये चौदाव्या वित्त आयोगासंबंधी प्रश्न विचारला होता.

नियंत्रक व महालेखापाल (CAG): राज्यघटनेच्या १४८ व्या कलमाद्वारे केंद्रीय पातळीवर एक महालेखापाल असेल अशी तरतूद केली आहे. नियंत्रक व महालेखापाल केंद्र व राज्य पातळीवरील समग्र वित्तीय व्यवस्थेचा प्रमुख असून सार्वजनिक निधीचा रक्षणकर्ता आहे. वित्तीय प्रशासनात घटनात्मक व कायदेशीर व्यवहाराची हमी देणे हे त्याचे प्रमुख कर्तव्य आहे. महालेखापालची नेमणूक राष्ट्रपतीमार्फत होते. पदाचा कार्यकाल सहा वर्षे अथवा ६५ वर्षांपर्यंत (यापैकी जे आधी येईल) असेल.

भारताचा महान्यायवादी (Attorney General) : घटनेच्या कलम ७६ अन्वये हे अधिकारपद निर्माण करण्यात आले आहे. देशाचा सर्वोच्च कायदा अधिकारी म्हणून हे पद कार्यभार सांभाळते. राष्ट्रपतीद्वारा याची नेमणूक होते. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून जी किमान पात्रता लागते तीच पात्रता या पदासाठी देखील आवश्यक असते. पदाचा कार्यकाळ निश्चित केलेला नसून राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत तो पदभार सांभाळतो. शासन यंत्रणेस कायदेशीर सल्ला देण्याचे कार्य पार पाडणारे महत्त्वाचे पद आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोग :

अनुसूचित जाती आणि जमातींचा मागासलेपणा घालविण्यासाठी त्यांना विशेष संधी देऊन मुख्य प्रवाहात आणण्याकरिता काही विशेष घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या. २००३ साली ८९ व्या घटनादुरुस्तीद्वारे राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे दोन स्वतंत्र आयोगामध्ये विभाजन झाले. कलम ३३८ अंतर्गत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग तर कलम ३३८ अनुसार राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग कार्यरत झाले. मुख्य परीक्षेत या दोन्ही आयोगांवर प्रश्न विचारले गेले आहेत.

निवडणूक आयोग : घटनाकर्त्यांनी निवडणूक यंत्रणेचे लोकशाहीतील महत्त्व मध्यवर्ती स्थान ओळखून घटनेच्या कलम ते ३२४ मध्ये निवडणूक आयोगाची तरतूद केली. संसदेच्या तसेच राज्यांच्या विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी मतदारांच्या अद्ययावत याद्या तयार करणे, त्या निवडणुकांचे त्याचप्रमाणे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या पदांच्या निवडणुकांचे संचलन करणे, या निवडणुकांच्या कामावर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण करणे हे अधिकार निवडणूक आयोगाकडे देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगात मुख्य निर्वाचन आयुक्त आणि आणि त्याखेरीज जेव्हा राष्ट्रपतीस वाटेल तेव्हा आणखीही आयुक्त असतात.

बिगर घटनात्मक आणि वैधानिक आयोग

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग : ही संसदीय कायद्याद्वारे निर्माण झालेली संस्था असून मानवी हक्काच्या संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावते. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ द्वारा हा आयोग स्थापन करण्यात आला. नागरिकांच्या जीवित, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याच्या मानवी हक्काचे योग्य रीतीने संरक्षण केले जाते की नाही यावर आयोग लक्ष ठेवतो.

माहिती आयोग : राजपत्रातील प्रसिद्धीद्वारे केंद्र सरकारने केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना केली. या आयोगामध्ये एक मुख्य माहिती आयुक्त आणि कमाल दहा माहिती आयुक्त असतात. या सर्वांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. २०२०च्या मुख्य परीक्षेमध्ये माहिती आयोगावर प्रश्न विचारला गेला.

राष्ट्रीय महिला आयोग : राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९० अन्वये १९९२ मध्ये या आयोगाची निर्मिती करण्यात आली. महिलांसाठी पुरवण्यात आलेल्या घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचे पुनरावलोकन करण्यासाठी हा आयोग स्थापन केला गेला. २०२०च्या परीक्षेत महिला सक्षमीकरण, लिंगभावात्मक न्याय या अनुषंगाने महिला आयोगावर प्रश्न विचारण्यात आला.

घटनात्मक व बिगर घटनात्मक संस्था वा आयोग यांची तयारी करणे आवश्यक ठरते. कारण दरवर्षी यातील १ ते २ प्रश्न विचारले जातात. घटनात्मक व बिगर घटनात्मक आयोग वा संस्था यांचे अध्ययन चालू घडामोडींच्या अनुषंगाने करणे आवश्यक ठरते. ही बाब वर उल्लेख केलेल्या प्रश्नांमधून अधोरेखित होते. तथापि या संस्थांची रचना, कार्ये, अधिकार इत्यादी मूलभूत माहिती असणे आवश्यक आहे. या घटकाची तयारी इंडियन पोलिटी (लक्ष्मीकांत), भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया (खंड १) (तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर) या संदर्भ ग्रंथांमधून करता येईल. तसेच संबंधित संस्थांच्या संकेतस्थळाला भेट देऊन आपल्याकडील माहिती अद्ययावत ठेवावी. याबरोबरच 'इंडियन एक्सप्रेस' व 'लोकसत्ता' आदी वृत्तपत्रांचे नियमित वाचन करणे आवश्यक आहे.

लोकसत्ता

एमपीएससी मंत्र

निर्णय निर्धारण आणि समस्या समाधान

फारुक नाईकवाडे

हा घटक म्हणजे उमेदवारांच्या प्रशासकीय आणि एकूणच जबाबदार नागरिक म्हणून असलेल्या अभिवृत्तीची चाचणी असते. सर्वसाधारण व्यवहारज्ञान, नैतिकदृष्ट्या योग्य-अयोग्य मुद्द्यांची जाण आणि भारतीय संविधानातील तरतुदींचे भान असल्यास कमीत कमी वेळेत हा विभाग जास्तीत जास्त गुण मिळवून देऊ शकतो. हा घटक पेपरच्या सुरुवातीला सोडवून आत्मविश्वास बळकट करायचा की शेवटच्या दहा मिनिटांत किंवा खूपच अवघड प्रश्नांमध्ये वेळ गेल्यावर ताण दूर करण्यासाठी अशा प्रश्नांनंतर सोडवायचा हा ज्याच्या त्याच्या कम्फर्ट झोनचा मुद्दा आहे. पण हे प्रश्न सोडविताना मन शांत ठेवून पर्यायांचा विचार करणे आणि जास्तीत जास्त समर्पक उत्तर शोधणे साध्य करायचे असेल तर सराव आणि सरावाचे विश्लेषण यांना पर्याय नाही!

या प्रश्नांमध्ये एखाद्या सुजाण नागरिकाचे हक्क आणि त्याची एखाद्या प्रसंगातील नागरिक या नात्याने किंवा हितसंबंधीय म्हणून असलेली कर्तव्ये यांच्याशी संबंधित दैनंदिन जीवनातील पेचप्रसंग आणि त्यावरील तोडगा विचारला जातो, याचबरोबर संस्थेत किंवा प्रशासनात अधिकारपदावर असताना येणारी आव्हाने व त्यावरील तोडगा किंवा नैतिकदृष्ट्या द्विधा मनःस्थितीत अडकविणाऱ्या समस्यांवर आधारित प्रश्न यामध्ये विचारले जातात. उमेदवारांचा महिलांबाबतचा दृष्टिकोन व संवेदनशीलता तपासणारा किमान एक तरी प्रश्न विचारला जातो.

हे प्रश्न सोडवताना निवडलेल्या पर्यायाला ०/ १/ १.५ की २.५ गुण मिळतील याचा विचार आवश्यक आहे. त्यामुळे पर्यायांचे श्रेणीकरण करण्याची सवय लावून घ्यायला हवी. काही वेळेला उत्साहाच्या भरात एकदम आदर्शवादी पर्याय निवडला जातो. पण तो अमलात आणण्याचा अधिकार आपल्याकडे नसेल किंवा त्यातून एखादा 'साईड इफेक्ट' उद्भवण्याची शक्यता असेल तर त्याचे गुण कमीच मिळणार. त्यामुळे सर्वात योग्य पण व्यवहार्य आणि उपलब्ध असल्यास दूरगामी परिणाम साधणारा पर्याय निवडणे हे २.५ गुण मिळण्यासाठी आवश्यक आहे. असे प्रश्न सोडविताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

प्रश्न लक्षपूर्वक वाचून नेमकी समस्या समजून घ्यावी. प्रसंगातील पुढील महत्त्वाच्या ठळक बाबी लक्षात घ्याव्यात- प्रसंगातील नेमकी समस्या मांडणारे मुद्दे, संवेदनशीलपणे हाताळायचे मुद्दे, संबंधित व्यक्ती वा व्यक्तिगटांचे हितसंबंध, असल्यास वर्णन केलेल्या शक्यता, दिले असल्यास सामाजिक/ सांस्कृतिक/ आर्थिक/ राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे मुद्दे.

या प्रसंगातील तुमची नेमकी भूमिका कोणती आहे ते लक्षात घ्यावे. कोणतीही भूमिका स्पष्टपणे तुम्हाला दिलेली नसेल तर एक सुजाण नागरिक म्हणून योग्य निर्णय घेणे तुमच्याकडून अपेक्षित आहे हे समजून घ्यावे.

प्रसंगातील सर्वात कच्चा व मजबूत पक्ष कोणता ते लक्षात घ्यावे. राज्यघटनेतील तरतुदी व तत्त्वज्ञान, सर्वसाधारण नैतिकता व नैसर्गिक न्याय, निर्बल समाजघटकांविषयी तसेच पर्यावरणीय संवेदनशीलता यांच्या आधारे समतोल दृष्टिकोन व तटस्थता ठेवून याबाबतचे मूल्यमापन करावे.

दिलेले सर्व पर्याय व्यवस्थित वाचून घ्यावेत. वरील मूल्यमापनाच्या आधारे पूर्णपणे असंवेदनशील, बेजबाबदार, टोकाचे पर्याय बाद करावेत.

यानंतर योग्य वाटणाऱ्या पर्यायांच्या योग्यतेची



श्रेणी ठरवावी. आपण निवडलेल्या उत्तराला तुलनात्मकरीत्या किती गुण मिळू शकतील याचा अंदाज येण्यासाठी पर्यायांचे श्रेणीकरण करण्याची सवय उपयोगी ठरते.

पर्यायांची श्रेणी ठरवताना तुमच्या भूमिकेच्या अनुषंगाने पर्यायामधील आवश्यकता, व्यवहार्यता विचारात घ्यावी. आवश्यक वाटू शकला तरी व्यवहार्य नसलेला पर्याय बाजूला ठेवावा. त्यानंतर असा पर्याय अमलात आणण्याचे अधिकार तुमच्याकडे आहेत का हे तपासावे. अशी अधिकारिता नसेल तर तो पर्याय योग्य असला तरी तुम्ही अमलात आणू शकत नसल्याने त्याची श्रेणी त्या भूमिकेपुरती कमीच गृहीत धरायला हवी. अशा श्रेणीकरणातून जास्तीत जास्त योग्य पर्यायापर्यंत पोहोचण्यास मदत होते.

उरलेल्या पर्यायातून जास्तीत जास्त सकारात्मक आणि बहुतांश हितसंबंधियांना मान्य होऊ शकेल असा पर्याय शोधावा. असे दोन पर्याय आढळले तर जास्त दूरगामी परिणाम करणारा, कायमस्वरूपी तोडगा सांगणारा पर्याय निवडावा.

व्यवस्थापकीय अभिवृत्ती तपासणारे प्रश्न हा मुलाखतीच्या टप्प्यावरील सर्वात महत्त्वाचा भाग असतो. समाधानकारक उत्तरे देणाऱ्या उमेदवाराला मुलाखत मंडळ पुढे असे प्रसंगाधारित प्रश्न विचारून उमेदवाराचा अशा tricky प्रसंगातील प्रतिसाद आणि कारवाई काय असेल हे तपासत असते. अशा वेळी उमेदवारांना आपले स्वतःचे असे उत्तर वा पर्याय मांडता येतात. पण लेखी परीक्षेमध्ये दिलेल्या पर्यायातीलच एक जास्तीत जास्त समर्पक पर्याय कोणता असेल हे शोधायचे आहे. त्यामुळे उपलब्ध पर्यायांचे विश्लेषण आणि त्यांच्या समर्पकतेचे श्रेणीकरण करण्याची सवय असायला हवी.

सी सॅटमधील हमखास गुण मिळवून देणारा घटक म्हणजे निर्णय निर्धारण व समस्या समाधान हा घटक. एकूण १२.५ गुणांसाठी ५ प्रश्न या विभागात विचारले जातात. या प्रश्नांना नकारात्मक गुण दिले जात नाहीत. त्यामुळे चांगला स्कोअर करायचा असेल तर अधिकाधिक समर्पक उत्तरे देऊन जास्तीत जास्त गुण मिळवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. या पाच प्रश्नांसाठी एकूण १० मिनिटे वापरली तर किमान ५ गुण आणि योग्य अभिवृत्ती विकसित केली तर १० ते १२ गुण मिळवता येतात. पुढील लेखामध्ये अशा प्रश्नांसाठी आयोगाने दिलेले पर्याय व त्यांचे गुण याबाबत विश्लेषणात्मक चर्चा करण्यात येईल.

१ पद (ईडब्ल्यूएस). iii) (३१०- WR- इंजिनीअरींग पदवी आणि संबंधित कामाचा १ CGHS Mumbai (३१४- WR-१३५२२) - कॅटेगरी VH साठी

लोकसत्ता

यूपीएससीची तयारी

केंद्रीय कायदे मंडळ

- प्रवीण चौगले

भारतामध्ये संसदीय शासनपद्धतीचा अवलंब केला आहे. संसदीय शासन पद्धतीत कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यांचा घनिष्ठ संबंध असतो. संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेत कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार असते तर कायदेमंडळाने केलेल्या कायद्यांची घटनात्मकता तपासून बघण्याचा अधिकार न्यायालयाला असतो. या तीन संस्थांच्या प्रचलनावर संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचे यशापयश अवलंबून असते. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यातील विशिष्ट प्रकारचा संबंध अधोरेखित करणारा प्रश्न २०२१च्या मुख्य परीक्षेत विचारला गेला.

Q. To what extent, in your view, the parliament is able to ensure accountability of the executive in India? (150 words).

भारताला ब्रिटिशकालीन संसदीय शासनाचा प्रदीर्घ अनुभव होता. तसेच भारतीय समाज विविध घटकांनी व अस्मितानी बनलेला आहे. परिणामी, शासनाच्या प्रक्रियेमध्ये या सर्व घटकांना प्रतिनिधित्व देऊ शकणारी पद्धत म्हणून संसदीय पद्धतीचा भारतामध्ये स्वीकार केला गेला. याबरोबरच भारतासारख्या देशामध्ये आधुनिक लोकशाही शासन कारभारात स्थिर व जबाबदार शासन या दोन बाबी महत्त्वाच्या ठरतात. भारतीय समाजाचे विशिष्ट स्वरूप लक्षात घेता विविध प्रकारे जबाबदार शासनाची हमी देणारी संसदीय पद्धत उपयुक्त आहे, असे घटनाकरांना जाणवले. म्हणून स्थिर शासनाची हमी देणाऱ्या अध्यक्ष पद्धतीपेक्षा जबाबदार शासनाची हमी देणारी संसदीय पद्धत भारतासाठी श्रेयस्कर ठरेल, असा त्यांचा कयास होता. प्रस्तुत लेखामध्ये भारतीय संसदेची रचना अधिकार व कार्ये समजून घेणार आहोत.

राज्यघटनेच्या भाग पाचमधील कलम ७९ ते १२२ मध्ये संसदविषयक तरतुदी करण्यात आल्या आहेत. संसदेमध्ये राष्ट्रपती, राज्यसभा आणि लोकसभा यांचा समावेश होतो. भारताचे राष्ट्रपती संसदेचा अविभाज्य घटक आहेत. कारण राष्ट्रपती संसदेचे सदस्य नाहीत किंवा ते संसदेच्या कामकाजात भाग घेत नाहीत, परंतु कोणतेही विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कायद्यात रूपांतरित होऊ शकत नाही.

१) राज्यसभा : राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. राज्यसभा हे स्थायी सभागृह असून एकूण सदस्य संख्या २५० आहे. त्यापैकी २३८ सदस्य हे घटक राज्यांचे व केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करतात. त्यांची निवड अप्रत्यक्षरीत्या केली जाते आणि १२ सदस्य राष्ट्रपतीद्वारा नेमले जातात. राज्यसभेला लोकसभेइतके अधिकार नसल्याने बऱ्याचदा राज्यसभेला विलंब करणारे सभागृह आहे असे मानले जाते. घटना दुरुस्ती विधेयक सोडल्यास इतर बाबतीत लोकसभेला व्यापक अधिकार आणि प्रभावी भूमिका देण्यात आलेली आहे. असे असले तरी आघाडी शासन, प्रादेशिक पक्षांचा उदय आणि अलीकडे चर्चेत असणारी सहकारी संघवाद ही संकल्पना, आणि मागील दशकांत पंतप्रधान तसेच अनेक केंद्रीय मंत्री राज्यसभेचा भाग असल्याने या सभागृहाचे महत्त्व वाढले. राज्यसभेची तयारी करताना राज्यसभेचे पदाधिकारी, अधिकार आणि कार्ये पाहणे, तसेच समकालीन घडामोडींच्या संदर्भात राज्यसभेचे अध्ययन महत्त्वपूर्ण ठरते.

२) लोकसभा : लोकसभा हे संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकांचे थेट प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून लोकसभा ओळखली जाते. लोकसभेची एकूण सभासद संख्या ५५२ इतकी आहे. त्यापैकी ५३० घटक राज्यांचे प्रतिनिधी, २० केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी आणि २ अंग्लो इंडियन समुदायाचे प्रतिनिधी नियुक्त करण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. मात्र २०२० मध्ये ही तरतूद रद्द करण्यात आली आहे. लोकसभेचे सदस्य प्रत्यक्षपणे, प्रौढ मतदान पद्धतीने भारतीय नागरिकांकडून निवडले जातात. प्रत्येक राज्याला राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने हे मतदारसंघ ठरविले जातात. लोकसभेचे अध्ययन करताना लोकसभेची रचना, कार्ये, अधिकार तसेच लोकसभेचे पदाधिकारी इत्यादी बाबी जाणून घेणे आवश्यक ठरते. लोकसभा व राज्यसभा या दोन सभाग्रहांवर वारंवार प्रश्न विचारले जातात.

यानंतर संसदेतील कायदे निर्मिती प्रक्रियेविषयी थोडक्यात चर्चा करू. कायदेमंडळ कायदे निर्मितीचे महत्त्वाचे कार्य पार पाडते. त्यादृष्टीने संसदेमध्ये विविध विधेयके मांडली जातात. दोन्ही सभागृहांनी विधेयकास मान्यता दिल्यानंतर ते विधेयक राष्ट्रपतींकडे संमतीसाठी पाठविले जाते. अशारीतीने संसदेची दोन्ही सभागृहे आणि राष्ट्रपती यांच्या मंजुरीने विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. परीक्षेच्या दृष्टीने आपल्याला विधेयकांचे प्रकार, एखादे विधेयक मंजूर होण्याची प्रक्रिया, विधेयकासंबंधीचे राष्ट्रपतींचे अधिकार, संयुक्त बैठक इत्यादी बाबी जाणून घ्याव्या लागतात. याबरोबरच आपल्याला संसदीय प्रक्रियेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संसदीय प्रक्रियेमध्ये संसदेचे अधिवेशन, प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर, स्थगन प्रस्ताव, अल्पकालीन चर्चा, लक्षवेधी सूचना, हक्कभंग प्रस्ताव, विश्वासदर्शक ठराव इत्यादी बाबींबरोबरच सभागृहाचा नेता, विरोधी पक्ष नेता, पक्षप्रतोद, अधिवेशन बोलावणे, अधिवेशनाची समाप्ती इत्यादी बाबींची माहिती असणे आवश्यक आहे. या घटकाशी संबंधित असणारा महत्त्वाचा उपघटक संसदीय समित्या आहे. यांची माहिती असणे आवश्यक ठरते. संसदीय समित्यांचे दोन प्रकार पडतात. स्थायी समिती आणि तदर्थ समिती. या अंतर्गत विविध समित्या जसे लोकलेखा समिती, अंदाज समिती, सार्वजनिक उपक्रम समिती तसेच इतर तदर्थ समिती यांची कार्ये, अधिकार या बाबी जाणून घ्याव्यात. २०२१ च्या मुख्य परीक्षेमध्ये संसदीय समितीविषयी एक सविस्तर प्रश्न विचारण्यात आला.

Q. Do department- related Parliamentary standing committees keep the administration on its toes and inspire reverence for Parliamentary control? Evaluate the working of such committees with suitable examples. (250 words).

या घटकाची तयारी ह्याआपली संसद' (सुभाष कश्यप), 'भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया (खंड १)' (तुकाराम जाधव आणि महेश शिरापूरकर) तसेच वृत्तपत्रे, 'योजना', EPW यांसारखी मासिके यांचे नियमित वाचन करून करावी.